नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ



विदर्भ साहित्य संघ, नागपूर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें

मुखपत्र

युगवाणी

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

अनुक्रमणिका

★

कविता

१ साक्ष—सौ. संजीवनी मराठे, बी. ए. ...३४

२ मुल्खाची तूं छटेल म्हणती!—प्रा. पु. शि. रेगे, बी. एस् सी. ...३४

३ रसिकास—प्रा. भ. श्री. पंडित, एम्. ए. ...३४

४ दातायाचक—दा. ल. अडोणी, एम्. ए. ..३४

५ सारीपाट—ना. मा. सरपटवार ...३५

६ चंचले!—अनन्त आठले, बी. ए. ...३५

साहित्यिकांचा परिचय

१ गुणवंत हनुमंत देशपांडे—पां. श्री. गोरे ...३६

प्रबंध

१ गाथा सप्तशतीचा काळ—म. म. कृष्णशास्त्री घुले...३८

ललित गद्य

१ पुरुषांचें हृदय—प्रा. 'शांताराम,' एम्. ए. ...५१

२ खरेदी—लीला देशमुख, बी. ए. ...५५

३ मी निराळी नाही!—केशव केळकर, बी. ए. ...५९

विविध

१ संपादकीय ...६४

संपादकीय

(मलपृष्ठ ३ वरून)

खटला करावा. जामीनकीपेक्षां हा उत्तम मार्ग आहे. धुळ्याच्या गेल्या वृत्तपत्रकार परिषदेंत अशीच मागणी करण्यांत आली होती. ती प्रांतिक सरकारांनी अंमलांत आणावयास पाहिजे.

दुष्काळाच्या जबड्यांत

हें संपादकीय लिहीत असतांना वाङ्मयादि उच्च गणल्या गेलेल्या गोष्टींचा फोलपणा मला पदोपदीं भयानक रीतीने जाणवत आहे! आणि, याला कारण या प्रांतांतील सध्याची अन्न-परिस्थिति होय. या प्रांतांत दुष्काळाची भयंकर आग लवकरच पेटून तींत लाखो निरपराध जीवांची आहुति पडणार की काय, अशी भीति वाटण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली आहे! प्रांतिक सरकार, व्यापारी व बडे जमीनदार यांनी मानवता बुद्धीने व कर्तव्य म्हणूनहि हा प्रश्न तातडतोब व परस्पर सहकार्याने न सोडविल्यास भावी महा अनर्थ अटळ आहे!!

वाङ्मय, कला, संस्कृति—या थोर थोर गोष्टी केवळ भरल्या पोटींच शक्य आहेत, हा मार्क्सवाद्यांचा सिद्धान्त सर्वथैव सत्य आहे! या सिद्धान्ताची प्रचीति इतक्या भयानक रीतीने यावी, हें मात्र सर्वांचें दुर्दैव होय! कविवर्य हरींद्रनाथ चट्टोपाध्याय यांच्या

बिन भोजनके भगवान् कहाँ ?

या कवितेचें येथे स्मरण झाल्यावाचून राहत नाही! हरींद्रांच्या या कवितेंत केवढें निष्ठुर सत्य भरलेलें आहे!

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष २ रें : संपादक : फेब्रुवारी
अंक २ रा वामन नारायण देशपांडे १९४७

चालू अंकांतील कवि व त्यांच्या कविता

---

१. साक्ष—सौ. संजीवनी मराठे यांचें विद्यमान मराठी कवयित्रींत फार वरचें स्थान आहे. त्यांची प्रस्तुत कविता भावमधुर आहे.

२. मुलखाची तूं छटेल म्हणती—प्रा. रेगे यांच्या या कवितेंतील नवीन धर्तीचा मोकळा प्रणय रसिकांस आकृष्ट करील. तंत्रदृष्ट्या दुसरें व चौथें कडवें लक्ष्यांत घेण्या-जोगें आहे.

३. रसिकास—प्रा. पंडित यांच्या या छोट्याच कवितेंतील भाषेची व रचनेची सफाई उल्लेखनीय आहे.

४. दाता याचक—'रघुवंशा' च्या पाचव्या सर्गांतील प्रसंगावर आधारलेलें हें दा. ल. अडोणी, सागर, यांचें सुनीत हृदयंगम आहे.

५. सारी पाठ—वणीचे ना. मा. सरपटवार यांची पत्नी-निधनास अनुलक्षून लिहिलेली ही कविता कल्पकतेने युक्त, पण करुणरसाने आर्द्र अशी आहे.

६. चंचले!—धारचे अनन्त आठल्ये यांचें हें प्रेमगीत चटकदार आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साक्ष

चांदरातीं माळरानीं जाउनी
बैसलों होतो सुखें भाराबुनी
तारकांचे दीप होते तेवते
उजळ अपुले नेत्र होते जागते !

शुक्रतारा हर्षलें पाहून मी
मंगळाच्या लालिमा तुज मोहवी
गोल ते ?-छे, प्रेमचिन्हें आपुलीं
साक्ष कीं प्रीतीस होतीं राहिलीं !

रम्य त्या रात्रीं कुठें ? त्यांच्या स्मृती-
आज एकाकी जिवाला सोबती;
तूं कुठे ?-शतयोजनें प्राणा! दुरी,
मी उभी या शून्य प्रासादांतरीं !

शुक्रमंगळ अंतराळीं तेवती
लोचनींच्या आसवांना हासती !

—संजीवनी मराठे

★

मुल्खाची तूं छटेल म्हणती

मुल्खाची तूं छटेल म्हणती
उमर तुझी तर पंध्रा-सोळा
चालहि गरती टापटिपीची
डोळ्याला ना भिडाविसि डोळा !

आम्ही दूर देशचे पंडित गुणवंत
ऐकुन चरित तुझें अडलों या नगरांत
इथली रीतभात ना आम्हां कांहिच माहीत

भाग्य उजळलें परंतु येथे
आजुबाजुला कितीक गोळा
मुल्खाची तूं छटेल म्हणती
उमर तुझी तर पंध्रासोळा !

कोणा कुळवंताची कन्या दिसतेस
जर का ठाऊक होइल कोठें असतेस
परदेशी आम्ही येऊं बाजुला वसतीस

भररस्त्यावर बघतां बघतां
घातलासही खुशाल डोळा
मुल्खाची तूं छटेल म्हणती
उमर तुझी तर पंध्रासोळा !

—पुरुषोत्तम शिवराम रेगे

★

रसिकास—

सहजीं किती फुलतीं फुलें
नि : सु-वास त्यांतिल दर्वळे
अवकाशिं तो मिसळे-मिळे
पळ त्यामुळे मन हो खुळें !

गळतीं यथावधि तीं फुलें
निघतीं तयांमधुनी फळें
पिकतांच तीं, फुटतांच तीं
रस ओघळे ! रस पाघळे ! !

रसिका ! तुला रस तो हवा ?—
नि:सु-वासही ?-पण तो 'हवा' !
सरलीं फुलें, भरलीं फळें
रस लूट खूप नवा नवा !!

—भवानी शंकर श्री. पंडित

★

दातायाचक

विद्यार्थीव्रत कौत्स पूर्ण करुनी
जाई स्वगेहा यदा
नम्रत्वें वरतन्तुला पुसतसे,
"द्यावी किती दक्षिणा ?"
"सेवेने तव तुष्ट मी, नच मला
शिष्या ! दुजी कामना"
"चौदा कोट सुवर्ण शास्त्रमित दे"
गर्जे पुन्हा प्रार्थिता.
मागाया गुरुदक्षिणा रघुनृपा
जो पातला तद्गृहीं
पात्रें मृण्मय पाहुनी उमजला
नि:श्रीक पृथ्वीपती

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घालावा गुरुभार योग्य न अशी
झाली जयाची मती
जातां "याचक रिक्तहस्त परते
होवो न दुष्कीर्ति ही"
ऐसें बोलुन "थांब यज्ञसदनीं"
त्या श्रोत्रिया प्रार्थुन
कैलासेश्वर जिंकण्या निजबलें
बैसे रघु स्यंदनी
रात्रीं चित्र सुवर्णवृष्टि घडली
स्वर्गांतुनी अंगणीं
अर्थी भूप परस्परां विनविती
"घ्या सर्व हें आपण"
दाता याचकयोग दुर्लभ जनीं,
स्वातीजला शुक्तिका
देई एक अशेष हेम, दुसरा
घेई न युक्ताधिका!

—दा. ल. अडोणी

★

सारीपाट

संसाराचा सारीपाट
काळासवें सुरू केला
सखी सोंगटी साथीला!

सारीपाट खेळतांना
इच्छिलेले दान पडे
काळा चारिलेत खडे!

सारीपाट खेळतांना
सखी, जाणे मनोगत!
काळावरी केली मात!

खेळ रंगांत येऊन
द्वैत संपलें सहज!
सखी, लेई नव तेज!

हाय! काळा! उलटुनी
पोट घरांत नरद
कशी केलीस गारद!!

—ना. मा. सरपटवार.

★

चंचले!

तुझ्या संगतीं किती सुखाचें जीवन हें झालें
वीज फुलोनी पुन्हा आपलें अंधारुन आलें!

अडगळींत तो पडला अजुनी आठवता पावा
अता तयाने कशास गावा हृदयींचा धावा!

न लाभला शब्दांना अधरीं विराम केव्हाही
अव्यक्तीं ते अता झुरावे! उपाय ना कांही!

कवितांच्या वहिवरती होती स्वाक्षरि तव गोल
धुळीस आता तिचें माहिती काय असे मोल!

ज्योतीवर ज्या झेप घेतली अति उल्हासानें
अता कापते मन ज्योतीच्या निव्वळ चित्रानें!

गतांत फिरते तरी स्मृती का ही मागे मागे
व्यर्थ जिवाचे शोभित आता तुटलेले धागे!

चमक एकदा पुन्हा चंचले! वा कडकड चपले!
दिपून आणिक फुटोत माझ्या प्रीतीचे डोळे!

—अनन्त आठले

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गुणवंत हनुमंत देशपांडे

पांडुरंग श्रावण गोरे

● रा. गोरे यांनी लिहिलेला रा. गुणवंत हनुमंत देशपांडे यांच्याविषयींचा हा परिचय--लेख छोटा असला, तथापि हृदयंगम आहे.

★ ★ ★

रा. गुणवंत हनुमंत देशपांडे हे सत्कवि या नात्याने आज महाराष्ट्रभर गाजलेले असले, तथापि रसिकांना त्यांचा परिचय प्रथम 'कोणता मानूं चंद्रमा' या कवितेमुळे बडोदें येथे झाला. बडोद्यास तेव्हा मराठी साहित्य–संमेलनाचें अधिवेशन रा. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलें होतें. त्या अधिवेशनांत गुणवंतरावांनी आपली ही कविता म्हटली. आधीच उत्कृष्ट कविता व त्यांत गुणवंतरावांची ठसकेदार म्हणणी. यामुळे ही कविता फारच परिणामकारक वठली व तिने आपल्या जनकाचें नाव तावडतोब सर्वत्र पसरविलें !

गुणवंतराव हे यवतमाळजवळच्या वाटखेड गावीं राहतात. ते तेथील वतनदार देशपांडे व पाटील आहेत. वाटखेडची त्यांची राहती गढी इतकी मोठी आहे की, तशी गढी त्या भागांत दुसरी नाही! गुणवंतरावांचें, घराणें बरेंच जुनें आहे.

गुणवंतराव हे दुय्यम शिक्षणासाठीं उमरावती येथे आपले मावसे रा. य. गो. देशपांडे, वकील, (पु. य. देशपांडे यांचे वडील) यांजजवळ राहत होते. त्यांना 'गणितां'त 'अगणित' अडचणी वाटूं लागल्यामुळे व मुख्यत: प्रकृतीच्या अस्वास्थामुळे ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होऊं शकले नाहीत! त्यांना नाइलाजाने घरीं बसणें प्राप्त झालें.

पण शिक्षणाची ही उणीव गुणवंतरावांनी वाचनाने भरून काढली. त्यांचा संस्कृत व मराठी काव्याचा व्यासंग गाढ आहे. त्यांना कालिदास तर आवडतोच, पण त्याहून भवभूति अधिक आवडतो. प्राचीन मराठी कवींत ज्ञानदेव व तुकाराम यांच्यावर त्यांचा विशेष भर आहे. ज्ञानदेवाचा 'अमृतानुभ' ग्रंथ त्यांस अलौकिक वाटतो. आधुनिक मराठी कवींपैकी Bee यांजवर त्यांची फार श्रद्धा आहे. रवींद्रनाथ टागोर यांचे इंग्रजी काव्य ग्रंथहि गुणवंतरावांनी वाचलेले आहेत. 'गीतांजली'पेक्षा त्यांना 'गार्डनर' संग्रह जास्त आवडतो.

गुणवंतरावांना कित्येक रसिक कवींचा निकट सहवास लाभण्याचें भाग्यहि प्राप्त झाले आहे. अशा कवींत कै. बोवडे, उपाध्ये, टेकाडे, आ. रा. देशपांडे प्रभृतींचा प्रामुख्याने निर्देश केला पाहिजे.

सध्या गुणवंतराव वाटखेड येथे वतनवाडी संभाळून असतात. आज कोणत्या वतनदाराचें जुनें वैभव कायम राहिलें आहे? गुणवंतरावहि या गोष्टीस अपवाद नाहीत. पण ते शेतीवाडी करून मानाने राहूं शकतात, याचेंच समाधान वाटावयास पाहिजे!

गुणवंतरावांचा ओढा प्रथमपासून अध्यात्माकडे आहे. ज्ञानदेव–तुकारामाच्या वाङ्मयांत ते गढून जाऊं शकतात, तें याच मनोवृत्तीमुळे. गुणवंतरावांच्या आध्यात्मिकतेची छाप त्यांच्या कवितेवर उमटली आहे. 'कोणता मानूं चंद्रमा' ही कल्पनाप्रचुर शृंगारिक कविता गुणवंतरावांना प्रसिद्धि मिळवून देण्यास कारणीभूत झालेली असली, तथापि 'खरे गुणवंतराव' त्यांच्या आध्यात्मिक कवितेंतच शोधावयास पाहिजेत. त्यांच्या या आध्यात्मिक कवितेने 'गूढगुंजना'चें रूप धारण केले आहे. गुणवंतरावांच्या अलि-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कडील कवितांत गूढगुंजनपर कवितांचीच मोठी संख्या आहे.

गुणवंतरावांच्या कवितेचा प्रथम खंड 'निवेदन' या नावाने १९३५ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतरहि त्यांचें काव्यलेखन स्फूर्तीच्या कलाप्रमाणे सुरूच असतें. त्यांच्या कवितांचा दुसरा खंड प्रसिद्ध होण्याची वेळ झालेली आहे. तो योग केव्हा येतो, हें पाहावयाचें आहे!

गुणवंतरावांच्या कवितेचे कल्पकता व भाषासौंदर्य हे दोन विशेष गुण होत. नवनवीन कल्पना स्फुरणें हें त्यांच्या प्रतिभेचे सहज कार्य होय. 'कोणता मानूं चंद्रमा' —ही कविता म्हणजे कल्पकतेची आतषबाजीच होय! त्यांच्या कल्पनेची भव्यता 'तान्हें बाळ' कवितेंत आढळते. तींत त्यांनी चांदण्यांवर भाताची व चंद्रिकेवर दुधाची कल्पना केली आहे, ती मनोज्ञ नाही, असें कोण म्हणेल? गुणवंतरावांना भाषाहि पुरेपुर वश आहे. रसाळ व मधुर शब्दयोजना करण्यांत त्यांचा हातखंडा आहे, इतकें म्हटलें तरी पुरें.

या दोन्ही गुणांपेक्षां गुणवंतरावांच्या कवितेचा आणखी एक विशेष गुण आहे. तो ईश्वर विषयक ओढ हा होय. गुणवंतराव हे सश्रद्ध गृहस्थ आहेत. ते कर्मठ मुळीच नाहीत; पण त्यांना ईश्वराविषयीं अपार भक्ति वाटते. या भक्तीच्या पोटींच मुख्यत: त्यांची गूढगुंजनपर कविता निर्माण झाली आहे. गुणवंतरावांच्या भक्तीला ज्ञानदेवादिकांच्या वेदांतपर ग्रंथांच्या व्यासंगाची जोड मिळालेली आहे; यामुळे त्यांची गूढवादी कविता संतवाङ्मयाच्या रंगाने रंगल्यासारखी पुष्कळदा वाटते.

'निवेदना' नंतरच्या गुणवंतरावांच्या कविता एकजात अध्यात्मपर आहेत, असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होणार नाही. त्यांच्या अलीकडील कवितांत 'परडी' ही कविता सर्वोत्तम आहे. या कवितेवरून गुणवंतरावांच्या काव्य स्फूर्तीचा झरा अजून आटलेला नाही, याची साक्ष पटते.

गुणवंतरावांच्या बहुसंख्य कविता गूढ—गुंजरपर असल्या, तरी पण त्यांनी इतर विषयांवरहि बरीच काव्यरचना केलेली आहे. त्यांचीं राधा-कृष्ण-विषयक गीतें त्या धर्तीच्या कवितांत नि:संशय वरच्या दर्जाचीं ठरतात. 'गोंधळ' या कवितेसारख्या त्यांच्या देशभक्तिवर कविता एके काळीं लोकप्रिय झाल्या होत्या. तात्पर्य, गुणवंतरावांच्या कविता अगदीच एकदेशी नाहीत. त्यांत विषय वैचित्र्यहि भरपूर आहे, हें ध्यानांत घेतलें पाहिजे.

वर सांगितल्याप्रमाणें गुणवंतरावांचा अनेक रसिक कवींशी निकट संबंध आलेला आहे खरा; पण त्यांनी आपणावर इतरांच्या कवितेची छाप पडूं न देतां आपली पृथगात्मता कायम ठेवली, यांतच त्यांची स्वतंत्र प्रज्ञा दिसून येते. गूढवादी कवितेस आजकाल बाजारभाव नाही, हें ते जाणतात; पण त्यांनी सवंग लोक प्रियतेचा हव्यास कधीच धरला नाही! नाही तर, एखाद्या 'भाई' लाहि रुचेल—पटेल अशी 'युगप्रवर्तक' (!) कविता त्यांना लिहितां आली नसती; काय? पण गुणवंतराव मुळी त्या गावचेच नव्हत!

विदर्भांत आज जे पहिल्या प्रतीचे कांही सत्कवि आहेत, त्यांत गुणवंतराव हे अग्रेसर आहेत. विदर्भांतच काय, पण अखिल महाराष्ट्रांतहि त्यांच्या प्रतिभेसारखी उज्वल प्रतिभा अन्य कवींत सहसा आढळणार नाही, असें मीं म्हटल्यास मजवर कुणाचा अधिक्षेप केल्याचा आरोप येऊं नये! आज गुणवंतराव प्रसिद्धीच्या दृष्टीने कांहींसे मागे पडल्यासारखे वाटतात, हें खरें; पण याला कारण सवंग लोकप्रियतेची त्यांना पर्वा नाही, हेंच होय. कीर्ति काय, आज आहे—उद्या नाही! खेरीज, समकालीनांचें योग्य महत्त्वमापन होत नसतें. पाच—पन्नास वर्षांनंतर कुणाचें नाव शिल्लक राहील, हें आजच कोण कसें सांगणार? गुणवंतरावांचें नाव मराठी भाषेंत दीर्घकाल टिकेल, असें निदान माझ्या तरी अल्प बुद्धीस वाटतें!

• • •

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गाथा सप्तशतीचा काळ

महामहोपाध्याय,
कृष्णशास्त्री घुले

★ म. म. 'पंडित सम्राट्' कृष्णशास्त्री घुले यांचा प्रस्तुत लेख त्यांच्या गाढ विद्वत्तेची व वादपटुत्वाची साक्ष देणारा आहे. या लेखावरील म. म. मिराशी यांचे उत्तर 'युगवाणी'त प्रसिद्ध होईल.

★ ★ ★

'गाथासप्तशती' या नांवाचें महाराष्ट्री प्राकृत भाषेंत लिहिलेलें गाथांचें (आर्यांचें) एक सुप्रसिद्ध काव्य आहे. त्याचा कर्ता किंवा संग्रहकर्ता 'हाल सातवाहन' या नावाचा राजा असून त्याचा काल इ. स. १ लें किंवा २ रें शतक होय, असा सांप्रदायिक समज रूढ आहे. त्याच्या विरुद्ध शके १८५१ मध्ये 'वागीश्वरी' मासिकाच्या पहिल्या अंकांत मी वरील मथळ्याखाली एक लेख लिहून असें दाखविलें होतें की, 'गाथा सप्तशती' ही हाल-सातवाहन राजानें केलेली नसून ती गोदा तीरावरील एखाद्या खेडेगावीं राहणाऱ्या गरीब ब्राम्हणानें केलेली असावी. तसेंच, तिचा कालहि इ. स. ६ व्या शतकापूर्वी जाऊं शकत नाही. या माझ्या तर्काच्या पुष्टयर्थ मीं जीं प्रमाणें दिली होती, त्यांत गजानन ही देवता इ. स. ५ व्या शतकांतील किंवा त्याच्या नंतरची असूनहि तिचा उल्लेख गाथा सप्तशतींत आहे, हेंहि एक प्रमाण दिलें होतें. त्यानें रुष्ट होऊन सुप्रसिद्ध विद्वान् संशोधक रा. 'अप्रबुद्ध' यांनी 'वागीश्वरी'च्या ३ ऱ्या वर्षाच्या १ ल्या अंकांत एक विस्तृत लेख लिहून त्यांत या 'सप्तशती' - च्या गाथांना बेधडक २ ऱ्या शतकांत ठेवतां येईल, असा आपला सिध्दान्त मांडला होता. त्याला त्याच वर्षाच्या ६ व्या अंकांत माझें उत्तर प्रसिद्ध झाल्यानंतर हा कालविषयक प्रश्न निकालांत निघाल्यासारखा झाला होता. कारण तेव्हांपासून आजपर्यंत तो प्रश्न पुन्हा कोणी उपस्थित केल्याचें माझ्या वाचनांत किंवा ऐकण्यांतहि आलें नाही. परंतु आतां विख्यात संशोधक आणि प्राचीन वस्तु-संशोधन-शास्त्रज्ञ म. म. प्रिन्सिपॉल मिराशी यांना याच वर्षी कांहीं महत्वाचा नवीन पुरावा उपलब्ध झालेला असल्यानें त्यांनी या प्रश्नाला पुन: चालना दिली आहे. त्यांनी या नव्या पुराव्याच्या आधारें 'गाथा सप्तशतीचा काळ' या नावाचा एक निबंध लिहून गेल्या मार्च महिन्याच्या ३ तारखेस येथील मध्यप्रांत-संशोधन-मंडळापुढे वाचला होता. तोच त्यांनी आतां येथील 'युगवाणी'च्या गेल्या मार्च महिन्याच्या अंकांतून प्रसिद्ध केला आहे.

आपणापुढे 'गाथासप्तशती'चा काळ कोणता, हा जरी मुख्य प्रश्न आहे, तरी तदनुषंगानें उत्पन्न होणारे जे कांहीं अवांतर प्रश्न आहेत, त्यांच्या समाधानकारक उत्तरांवरच या मुख्य प्रश्नाचें समाधानकारक उत्तर अवलंबून आहे. म्हणून आधी त्या प्रश्नांचाच विचार करूं. ते प्रश्न असे:— (१) 'सत्त सताइं हालेन विरइ आइं' (१।३) या तिसऱ्या गाथेंत ज्या हालानें सप्तशती रचिली, असें म्हटलें आहे, त्याच हालानें सर्व सातशेहि गाथा स्वत:च रचल्या किंवा ग्रथित केल्या की, दुसऱ्या कोणी त्या रचून किंवा ग्रथित करून हालाच्या नावावर प्रसिद्ध केल्या? (२) तो हाल राजा होता काय? (३) तो सातवाहन होता काय? (४) त्याचा काल कोणता?

आता, या प्रश्नांना प्रि. मिराशी यांच्या निबंधांत काय उत्तरें मिळतात, तें पाहूं. प्रथमत: त्यांत जी एक गोष्ट दिसून येते ती ही की, 'सप्तशती'चा इ. स. १ लें किंवा २ रें शतक हा संप्रदायगत काल प्रिन्सिपॉल साहेबांना मान्य नाही. कारण पान ८ वर ते लिहितात,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"सप्तशतीचा काळ निश्चित करतां आल्यास ......इतर प्रश्नांच्या निर्णयास मदत होईल. असें वाटून त्याचें विवेचन प्रस्तुत लेखांत केलें आहे." इतकेंच नव्हे, तर त्यांना उपलब्ध झालेल्या पुराव्याच्या आधारें विवेचन करून त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, सप्तशतीचा विशिष्ट असा काळ ठरविणें दुरापास्त आहे. ते पुढे म्हणतात, "वरील विवेचनावरून गाथा–सप्तशतींत निदान आठव्या शतकापर्यंत वेळोवेळीं भर पडत गेली असावी, हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल. या गाथांमध्ये कोणत्याहि कथानकाचा संबन्ध येत नसल्याने एखादी गाथा गाळणें किंवा नवीन घालणें मुळीच कठीण जात नसे; व याच कारणामुळे सप्तशतींतील गाथांच्या अनुक्रमांत व पाठांत अत्यंत वैविध्य दृष्टीस पडतें. सप्तशतीच्या हस्तलिखितांचा अभ्यास करून वेबरसाहेबाने तिच्या निदान ६ आवृत्त्या झाल्या असाव्या, असें सप्रमाण दाखविलें आहे. त्या सर्वांमध्ये फक्त ४३० गाथा समान आहेत. बाकीच्या कांहीं विशिष्ट काळांतच आढळतात, त्यावरूनहि सप्तशतीच्या आवृत्त्या भिन्न भिन्न काळांत होत गेल्या, हें उघड आहे. सप्तशतींतील गाथांची ही वस्तुस्थिति असल्याने तो गाथासंग्रह इ. स. च्या २ ऱ्या शतकांत रचिला गेला, या विधानाप्रमाणेच 'सप्तशती इ. स. ६ व्या शतकामागे जाऊं शकत नाही,' हें विधानहि लटकें पडतें. सप्तशतींतील कांहीं गाथा हालाच्याहि पूर्वीच्या असतील, तर कांहीं हालानंतर शेकडो वर्षांनी रचिलेल्या दिसतात. तेव्हा गाथासप्तशतींतील गाथांचा पुरावा इतर ग्रंथांच्या किंवा प्रसंगाच्या कालनिर्णयार्थ ग्राह्य धरण्यापूर्वी त्या गाथा विशिष्ट कालांत लिहिल्या गेल्या, हें ठरविणें जरूर आहे. पण तसें करणें सध्या दुरापास्त असल्याने अशा पुराव्यावर भिस्त न ठेवणें बरें."

हें अगदी खरें; पण त्यांनी स्वतःच आपल्या या दंडकाचा भंग केला आहे. कारण सप्तशतींतील गाथांना अनिश्चित स्वरूपाच्या ठरविण्याकरितां त्यांनी ज्या कविनामसूचीवर अधिकांश भिस्त ठेविली आहे, ती देखील अशाच अनिश्चित स्वरूपाची आहे. ते म्हणतात:—"आरंभीं प्रत्येक गाथेशीं तिच्या कवीचें नाव संलग्न असावें. पण पुढे कित्येक कवींचीं नावें विस्मरणामुळे किंवा लेखकांच्या निष्काळजीपणामुळें गळलेलीं दिसतात." यांतील दोन्ही तर्क परस्पराश्रित आहेत. पीतांबराच्या टीकेंत कांहीं गाथांशी कवींची नावें संलग्न असलेली दिसतात. यावरून पूर्वी प्रत्येक गाथेशी कवीचें नाव संलग्न असावें, हा एक तर्क, आणि प्रत्येक गाथेशी कवीचें नाव संलग्न असलेले दिसत नाही, म्हणून तीं गळलीं असावीं, हा दुसरा तर्क. यालाच कांहीं नावें मागाहून जोडलेलीं असावीं, हा तिसरा तर्क जोडला, म्हणजे गाथांच्या अनिश्चितपणांत आणि कविनामांच्या अनिश्चितपणांत पूर्ण साम्य उत्पन्न होते! मग एकावर भिस्त ठेवणें जर बरें नव्हे तर दुसऱ्यावर भिस्त ठेवणें हें बरें कसे? वस्तुत: आरंभीं प्रत्येक गाथेशी कवीचें नाव संलग्न होते, या तर्काला स्वतंत्र असा कांहीं एक आधार नाही. वेबरने गाथासप्तशतीची सहा निरनिराळीं संस्करणें पाहिलीं पण त्याला देखील ज्यांत सर्व गाथांशीं कविनामें संलग्न आहेत, असें एकहि संस्करण आढळल्याचें दिसत नाही. कारण काव्यमालेचे संपादक पं. दुर्गाप्रसाद असें सांगतात की, वेबरला फक्त १५१ च कविनामें आढळलीं होतीं. आणि, तींहि पीतांबरी टीकेंतच. यावरून आरंभीं गाथांशी कविनामें संलग्न नव्हतीं, असेंच म्हणावें लागतें. म. म. मिराशी म्हणतात, "सप्तशतीच्या अवशिष्ट टीकांत अनेक कवींचीं नावें दिलीं आहेत." पण हें तरी खरें आहे काय? नाही. ते म्हणतात त्याप्रमाणे आज तेरा टीका उपलब्ध आहेत, हें खरें; पण त्यांपैकीं एक पीतांबराची टीका सोडून त्या पूर्वीच्या[१] कोणत्याहि टीकेंत हीं नावें दिलीं असल्याचें कोणीहि सांगत नाहीत. उलट पीतांबरी टीकेचे संपादक जगदीशलाल शास्त्री आपल्या उपोद्घातांत लिहितात की, पीतांबराच्या टीकेचा लक्ष्यांत ठेवण्यासारखा विशेष हा आहे

[१] भुवन पालाची टीका पीतांबराच्या पूर्वीची म्हणता येत नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

की, गाथासप्तशतीच्या इतर टीकांमध्ये, ज्यांच्या संबंधाने आजपर्यंत कांहींएक माहिती नव्हती, अशा किती तरी सप्तशतींत आलेल्या गाथांच्या कर्त्यांचीं नावें तींत आलीं आहेत. हीच पहिली टीका होय की, जीमध्ये सप्तशतीच्या (३८८ ते ७०० गाथांपैकी) पुढे दिलेल्या सुमारे १६८ गाथांच्या कर्त्यांचीं शुद्ध नावें प्रथमच (has supplied for the first time) दिलेलीं आहेत.[२]

बरें, पीताम्बराच्या टीकेमध्ये तरी एकवाक्यता आहे काय? नाहीं. कारण वेबरला सापडलेल्या प्रतींत फक्त १५१ कविनामें दिसतात. पण तेवढ्यांतच निर्णयसागरला मिळालेल्या ताडपत्रावर बंगाली लिपींत लिहिलेल्या प्रतींतील नावांपैकी जवळ जवळ ४० नावांत भिन्नता आढळून येत असल्याचें निर्णयसागरने प्रसिद्ध केलेल्या सप्तशतीच्या उपोद्घातावरून दिसून येतें. आणि, दुसरें असें की, 'सप्तशतानि हालेन विरचितानि' असें सप्तशती-कर्ता स्वत: कबुलवाने सांगत असता त्याचें म्हणणें अव्हेरून त्याच्यानंतर हजार-बाराशें वर्षांनी अस्तित्वांत आलेल्या एका आधारावर ती शेकडो निरनिराळ्या कवींनी मिळून तयार केली, असा विपरीत ग्रह कोणी का करून घ्यावा, हें कळत नाही! [३]

तेव्हा अशा संदिग्ध प्रामाण्याच्या सूचींतील कांहीं अज्ञात नामगोत्र ("of unknown identity") कवींच्या केवळ नामसादृश्यावरून तत्संलग्न गाथेचा काल ठरविण्याचा प्रयत्न करणे विफल होय. उदाहरणार्थ— म. म. मिराशी यांनी निर्दिष्ट केलेली प्रवरसेन, सर्वसेन व वाक्पतिराज हींच नावें घेऊं. यांनी एकतर त्यांना उपलब्ध झालेल्या सप्तशतींत असलेल्या अनुक्रमे पाच, दोन व एक या गाथा काढून टाकून स्वनामांकित तितक्या गाथा त्यांच्या जागीं भरती केल्या असाव्या; किंवा, त्यांना मिळालेल्या त्या त्या प्रतींत कमी दिसलेल्या गाथांच्या जागीं तितक्या गाथा नवीन रचून त्यांची पूर्ति केली असावी. हे दोनच पक्ष संभवतात. पहिल्या पक्षीं प्रवरसेनादिकांसारख्या संभावित कवींनी दुसऱ्यांच्या गाथा काढून त्यांच्या जागीं स्वरचित गाथांची भरती करून त्यावर आपलीं नावें घातलीं असणें अगदीच असंभवनीय दिसतें. दुसऱ्या पक्षीं त्यांना त्यांना त्यांच्या त्यांच्या पोथींत तितक्या तितक्याच गाथा कमी असल्याचें आढळून आलें असावें, अशी कल्पना करणें देखील कल्पनेचा अतिरेकच होय! शिवाय हीं प्रवरसेनादिक नावें ते समजतात त्या त्या व्यक्तींचींच होत, ही तरी निव्वळ कल्पनाच होय. तेव्हा अशा कल्पनांच्या तरंगावर आधारलेला सप्तशतीचा काल विचारांतीं मुळीच टिकत नाही. मला तर असें वाटतें की, ही कवीनामसूचि टीकाकाराची कल्पनासृष्टिच होय.

येथे मला जर कोणी असें विचारील की, गाथांचें अस्तित्वच जर अशा अनिश्चित स्वरूपाचें आहे, तर त्यांच्या आधारावर तुम्ही ठरविलेला सप्तशतीचा ५ व्या शतकानंतरचा काल तरी ग्राह्य कसा मानतां येईल? तर त्याला माझें उत्तर असें आहे की, त्या गाथा जर खरोखरच अनिश्चित स्वरूपाच्या असतील, तर तशा गाथांच्या आधारावर मी आधारलेला काल तरी निश्चित स्वरूपाचा कसा असूं शकेल आणि मी तरी तो तसा समजा, असे कसे म्हणेन? खरी गोष्ट अशी आहे की, 'वागीश्वरी'त मी जेव्हा माझा पहिला लेख लिहिला, तेव्हा गाथा सप्तशतींत कांहीं गळती भरती झाली असेल, ही कल्पना देखील मला नव्हती. ती प्रथम म. म. मिराशींचा 'युगवाणी' तील लेख वाचला तेव्हा आली, तोपर्यंत सप्तशतींत आज दिसत असलेल्या सर्व गाथा मुळच्या हालकालिकच आहेत, असा माझा समज होता. त्यामुळे त्यांतील गाथांच्या

२ पीतांबराची 'गाथा सप्तशती' इंग्रजी उपोद्घात पा. १४. ३ प्रत्येक शतकाच्या शेवटीं समाप्तीच्या गाथा दिलेल्या आढळतात. पण त्या सप्तशतीच्या बाहेरच्या असून त्या त्या टीकाकाराने स्वत:च्या कल्पनेने रचिलेल्या दिसतात. म्हणून त्यांना प्रामाण्य असूं शकत नाही.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आधारें मीं त्यावेळीं तीं अनुमानें केलीं होतीं, तेव्हा ज्यांच्या आधारावर त्यावेळीं मीं अनुमानें केलीं होती, त्या गाथाच जर त्या कालच्या नव्हेत, असें सिद्ध झालें, तर त्यांवर बसविलेली अनुमानें अर्थात्च चूक ठरतील, हें सांगणे नकोच. पण तें सिद्ध करण्याचें ऐक्य एकच एक साधन हेंच आहे की, वेबरने सहाहि संस्करणांत समान असलेल्या ज्या ४३० गाथा निवडून काढल्या असल्याचें म. म. मिराशी सांगतात, त्यांमध्ये मी आधाराकरितां घेतलेल्या गाथा आढळत नाहीत, असें दाखविलें पाहिजे. तसें जोपर्यंत कोणी दाखवीत नाही, तोपर्यंत मीं ठरविलेला काल बदलण्याचें मला कारण दिसत नाही. म. म. मिराशी यांनी [1]गजाननवर्णनपर ? गाथा पं. जगदीशलाल शास्त्री यांच्या प्रतींत आढळत नसल्यामुळे तिच्या प्रामाण्याविषयीं आजच जो संशय प्रकट केला आहे, तो बरोबर नाही. कारण लाहोरच्या पीतांबरी टीकेंत जरी ती गाथा दिसत नसली, तरी पीतांबराच्याच ताडपत्रावरील बंगाली प्रतींत (पोट्टिस कवीच्या नावावर काव्यमालेच्या प्रतींत) ती दिलेली आहे. शिवाय लाहोरची प्रत एकाच पोथीवरून (Single ms.) तयार केलेली असल्याने आणि त्या पोथीलाच अनेक ठिकाणीं गळती लागली असल्याने तिचें प्रामाण्य बरेंच कमी झालें आहे, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. तात्पर्य काय की, मूळ गाथांमध्येच गळती-भरती झालेली असल्यामुळे आज दिसत असलेल्या गाथा आणि त्यांशी संलग्न दिसणारीं कविनामें इ. स. १३ व्या शतकांतील एकमेवाद्वितीय टीकाकारानेच दिलेलीं असल्याने व त्यांतहि ताळमेळ नसल्याने तींही संशयास्पदच आहेत. आणि, म्हणून त्यांच्या आधारावर केलेलीं अनुमानें हीं वेबरची यादी मिळेपर्यंत संशयग्रस्तच म्हणजे अनिश्चित स्वरूपाची राहणार, हें खास.

बरें, हालाच्या कालावरून सप्तशतीचा काल ठरवूं पाहावें तर तेंहि दुर्घटच दिसतें. कारण त्याचाहि काल तर निश्चित नाहीच. परंतु त्याच्या स्वत:च्या संबंधाने देखील बरीच अनिश्चितता दिसून येते. पं. जगदीशलाल शास्त्री एका पोथीच्या समाप्ति-लेखाच्या आधारें तो वायुपुराणांतील आंध्रभृत्य राजांच्या यादींतला तिसरा राजा शातकर्णी तोच हा हाल होय, असें म्हणतात.[2] डॉ. भाण्डारकर म्हणतात की, तो त्या यादींतील सातवा राजा होय, तर दुसरे कोणी म्हणतात की, तो मत्स्यपुराणांतील सतरावा राजा होय. त्याच्या कालासंबंधानेहि असाच मतभेद आहे. डॉ. भाण्डारकर म्हणतात की, त्याचा काल इ. स. चें १ लें किंवा दुसरें शतक होय. डॉ. कीथ हे भाषाशास्त्राच्या आधारें त्याचा काल इ. स. च्या २०० पासून ४५० पर्यंत अलीकडे ओढतात. असा मतभेद होण्याचें कारण की, ज्या पुराणांच्या आधारें हे लोक त्याचा काल निश्चित करूं पाहतात, त्या पुराणांतच मुळी एकवाक्यता नाही. वायुपुराणांत हाल हा सातवा राजा दाखविला आहे, तर मत्स्यांत तो सतरावा व विष्णु पुराणांत अकरावा, तर भागवतांत नववा दाखविला आहे. अशा स्थितींत संशोधक झाले तरी हालाच्या कालावरून सप्तशतीचा काल कसा निश्चित करूं शकणार ? एवंच, हें साधनहि निरुपयोगीच ठरतें. म्हणून सप्तशतीचा काल ठरविण्याचें तूर्त तरी स्थगित करून हाल हा कोण होता, या प्रश्नाचा विचार करूं.

या हालासंबंधी मुख्य प्रश्न असा आहे की, तो राजा होता अगर रंक होता ? यासंबंधी म. म. मिराशी म्हणतात की, हाल, सातवाहन व आन्ध्र (राजा) हे एकच होत. पण माझ्या मतें तो हाल राजा नसून गोदावरीच्या तीरावरील

---

१ ही (१. ४०३) गाथा गजाननपर आहे की, शिवपर आहे, हें अद्यापि अनिश्चितच आहे.

2 " The colophon distinctly states that king Satakarni, Satvahan was also called Hala. It is safe to assert, therefore, that the king Satakarni Hala [the third in the list of Vayu puran.] was the compiler of this Anthology--" Intro. p. १०.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एखाद्या खेड्यांत राहणारा, पण 'हाल' याच नावाचा एक ब्राह्मण कवि होता. पण आन्ध्र-भृत्यांच्या यादींतील हाल राजाच्या नामसादृश्या-वरून सप्तशतीचें कर्तृत्व हाल राजाला चिकटविण्यांत आलें असावें. अथवा, दुसऱ्याच नावाच्या तशा कवीने ती रचून, मृच्छकटिक शूद्रक राजाच्या नांवावर प्रसिद्ध केलें, तसें, हाल राजाच्या नावावर प्रसिद्ध केले असावें. कसेंहि असलें, तरी सप्तशती रचणारा हाल राजा नव्हता, हें खास. ज्या कारणावरून मी हें अनुमान करितों, तीं सर्व मी माझ्या या विषयावरील पहिल्या लेखांत 'वागीश्वरीं'त सविस्तर दिलीं आहेत. त्यांतील कांही येथे देतों. "हाल हा राजा असता, तर त्याने किंवा त्याच्या सभेंतील कवीने, राजाचें, राजपुत्राचें, राणीचें, राजघराण्याचें, राजलक्ष्मीचें, राजवैभवाचें, किंबहुना, राज्याशी कोणत्याहि प्रकारें संबंध असलेल्या एखाद्या तरी गोष्टीचें वर्णन अथवा नुसता निर्देश तरी खास केला असता. परंतु सप्तशतीच्या सातशें आर्यांमध्ये असा एकहि शब्द नाही की, ज्यावरून तिचा कर्ता राजा किंवा राजसभेंतील पंडित असावा, असें निश्चयाने म्हणतां येईल. त्यांतील सर्व वर्णन पाटील, पाटलाचा मुलगा, शेतकरी, शेतकऱ्याची सून, गवताची झोपडी, शेती–वगैरे ग्राम्य वस्तूंचेंच आहे." – आता दुसऱ्या गाथेंत 'कविवत्सल' हें हालाचें विशेषण आलें आहे, पण त्याचा अर्थ कवींना आवडणारा, कविप्रिय असा असल्याने तो कोणत्याहि प्रतिभावान् कवींला लागूं शकतो. म्हणून तेवढ्या एका विशेषणावरून त्या हालाला राजा ठरविणें योग्य होणार नाही. उलट तो राजा नव्हता या अनुमानाला पोषक अशीं गमकें सर्वत्र आढळतात.

यावर म. म. मिराशी यांचें म्हणणें असें की, "इ० स० च्या पहिल्या चार–पाच शतकांत महाराष्ट्रांत प्राकृत काव्यगंगेला पूर आला होता. राजापासून रंकापर्यंत ज्याला म्हणून नैसर्गिक काव्यप्रतिभा होती, त्याने प्राकृत गाथा रचलेल्या दिसतात. आणि, म्हणूनच या गाथांमध्ये खेडे-गावांतील जीवन चित्रित केलेलें दिसतें." पण मी म्हणतों की, रंकाबरोबर राजांनीहि जर गाथा रचिल्या होत्या, तर रंकांच्या खेड्यांतील जीवना-बरोबर राजांच्या राजधानींतील थोडें तरी जीवन चित्रित केलेलें का आढळू नये? आणि, तें जर तेथे मुळींच आढळत नाही, तर त्यांचा कर्ता कवि राजा नसून रंकच होता, असें अनुमान केल्यास बाध कोणता? हाल हा राजा होता, असें सप्तशतींत कोठे म्हटलें नाही, हें मिराशी यांना मान्य आहे. पण ते म्हणतात, "तशी परंपरागत समजूत होती." तशी समजूत होती हें, किंबहुना अद्यापि आहे हें, मलाहि मान्य आहे. माझें म्हणणे इतकेंच आहे की, या समजुतीला आज उपलब्ध असलेल्या वाङ्मयांत कांहीच आधार नाही. दुसऱ्या गाथेंतील 'कविवत्सल' या विशेषणावरून तसें म्हणता येत नाही, हें वर दाखविण्यांत आलेंच आहे. तेव्हा पूर्वोक्त समजूत सर्वथा निराधार आहे, असेंच म्हणावें लागतें.

आता, रंक कवींच्याच गाथांचा हालाने (हाल राजाने) संग्रह केला, या दुसऱ्या समजुतीचा विचार करूं. म. म. मिराशी लिहितात, "या ग्रंथाच्या (सप्तशतीच्या) तिसऱ्या गाथेंत कवि-वत्सल हालाने एक कोटि गाथांमधून सातशे गाथा निवडून काढून रचिल्या, असें म्हटलें आहे. या गाथेंत 'विरइ आइं (विरचितानि)' या पदाचा उपयोग केला असला, तरी या सर्व गाथा हालाने स्वतः रचिल्या नसून त्या त्याने अनेक ग्रन्थांतून निवडून ग्रथित केल्या, हें या गाथेंतील वर्णनावरून ते सांगतात तसें स्पष्ट तर नाहीच, पण अस्पष्ट देखील दिसतें, असें मला वाटत नाही. माझ्या म्हणण्याच्या समर्थनार्थ ती गाथाच मीं उद्धृत करितों—

'सत्त सताइं कइवच्छलेण कोडीअ मज्झ आरम्मि।
हालेण विरइ आइं सालंकाराणँ गाहाणम्' ॥ ३ ॥

---

१ ज्या समाप्तीच्या गाथांमध्ये सप्तशतीचें राजकर्तृकत्व सूचित केलें आहे, त्या सर्व सप्त-शतीच्या बाहेरच्या असल्याने अप्रमाण होत, हें मागे एका टीपेंत दाखविलेंच आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(सप्तशतानि कविवत्सलेन कोटेर्मध्ये
हालेन विरचितानि सालंकाराणां गाथानाम् ')

याचा सरळ अर्थ कविवत्सल (एकस्या) हालाने स्वलंकार अशा कोटि गाथामध्ये सातशे गाथा रचिल्या, असा आहे. आता, मी असें विचारतों की, "कोटि गाथांमधून निवडून काढून" हा अर्थ कोणत्या पदाचा आहे? 'कोडीअ मज्झआरम्मि' या पदाचा आहे म्हणावें, तर त्या पदाचा तसा अर्थ होऊं शकत नाही. कारण तें पद सप्तम्यन्त आहे, पञ्चम्यन्त नाही. सप्तमीचा अर्थ 'मध्ये' असाच होतो. 'मधून' असा होऊं शकत नाही. तसेंच ते जें म्हणतात की, " या गाथेंत हालाने सातशे गाथा रचिल्या (विरइ आइं), असे जरी म्हटले आहे, तरी त्या त्यानें रचिल्या नसून ग्रथित केल्या." गाथा स्पष्ट सांगते रचिल्या (रचितानी); तरी ते म्हणतात रचिल्या नाहीत! आणि, रचिल्या नाहीत हें कशावरून? तर त्यांतील वर्णनावरूनच!! पण कोणत्या वर्णनावरून 'रचिल्या' याचा अर्थ 'ग्रथित केल्या' असा होतो, हें त्यांनी सांगितलें नाही. गाथेंतहि वर्णन असें कांहीच नाही. तींत एवढेंच सांगितलें आहे की, कोटि गाथांमध्ये ७०० गाथा हालाने रचिल्या. या वर्णनावरून 'रचिल्या' याचा 'ग्रथित केल्या,' हा अर्थ कां व कसा प्रतीत व्हावा, हेंच कळत नाही! आणि, ते म्हणतात, तें स्पष्ट आहे! यावरून मला तर असें वाटतें की, 'कोडीअ मज्झआरम्मि' या सप्तम्यन्त पदाचा 'कोटिमध्यात्' कोटि गाथांमधून असा जो चुकीचा अर्थ केला आहे, त्याचाच हा परिणाम आहे. आणि, त्यालाच (त्या अर्थालाच) ते वर्णन म्हणत असावे कारण सप्तमीचा 'मधून' हा चुकीचा अर्थ स्वीकारला, म्हणजे कोटि गाथांमधून रचल्या याचा 'कोटि गाथांमधून निवडून काढून' असाच अर्थ होणार, दुसरा होऊंच शकत नाही. पण हा अर्थ नव्हे, अनर्थ होय! सप्तमीचा अर्थ 'मधून' असा होत नाही, हें त्यांना माहीत नाही, असें नाही. तें त्यांनाहि माहीत आहे, तरी त्यांनी जो अर्थ केला आहे, त्याचें कारण " जगत्यां ग्रथिता गाथा सातवाहन भूभुजा " (राजशेखर)—इत्यादि पद्यांतून व्यक्त झालेली परंपरागत समजूत हें होय. पण हें संशोधन नव्हे, असें मला वाटतें. हालाने दुसऱ्या कवींच्या गाथा संग्रहीत केल्या नाहीत. याचें दुसरेंहि एक गमक आहे. तें हें की, त्याने जर दुसऱ्या कवींच्या गाथा घेतल्या असत्या तर एका कवीच्या सर्व गाथा एकाच ठिकाणीं संग्रहीत केल्या असत्या. एक पहिल्या शतकांत, तर दुसरी तिसऱ्या शतकांत अशा अव्यवस्थितपणें दिल्या नसत्या. निदान त्याने स्वतःच्या तरी ४० हून अधिक असलेल्या गाथा एकत्रित दिल्या नसत्या. पण त्याहि विखुरलेल्याच दिसतात. बरें, विषयवारीने तशा दिल्या म्हणावें, तर सप्तशतींत विषय–विभाग मुळींच नाही. डॉ. कीथच्या मते देखील सर्व गाथा हालानेच रचिल्या आहेत, असें पं. जगदीशलाल आपल्या उपोद्घातांत म्हणतात. असो.

याप्रमाणे हाल हा राजा होता आणि त्याने दुसऱ्यांच्या गाथांचा संग्रह केला, या दोन्ही परंपरागत समजुती कशा निराधार अतएव कशा चुकीच्या आहेत, हें आपण पाहिलें. आता हाल हा सातवाहन होय, या समजुतीला तरी कांही आधार आहे किंवा नाही, हें पाहूं.

सप्तशती–कर्ता हाल हा सातवाहन होता ही समजूतच आधी कशी उत्पन्न झाली, हेंच कळत नाही! कारण हाल हा सातवाहन असें म्हटलेलें कोठेहि आढळत नाही. आंध्रभृत्यांच्या पुराणोक्त यादींत हाल हें नाव आहे, तर तेथे 'सातवाहन' नाही. नाशिकच्या शिलालेखांत सातवाहन नाव आहे, तर त्यांत हाल हें नाव नाही—इत्यादि अडचणी मीं माझ्या 'वागीश्वरी'-तील पहिल्या लेखांत सविस्तर दाखविल्या होत्या. त्यावर त्यांचें परीक्षण अप्रबुद्धांनी 'वागीश्वरी'त केलें आहे, त्याची पुनरावृत्ति न करितां म. म. मिराशींच्या पुराव्याचाच विचार करितों. त्यापूर्वी येथे इतकें सांगणे अवश्य आहे की, माझ्या पहिल्या लेखांत 'शातवाहनकुलयशः प्रतिष्ठापनकरस्य' आणि 'कुलविपुलाकरस्य'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या दोन विशेषणांत पुनरुक्ति भासत असल्याने ' सातवाहन ' हें शातकर्णीच्या आईचें कुलनाव असावें, असा मीं तर्क केला होता. परंतु त्या पुनरुक्तवत् भासणाऱ्या विशेषणांची जी उपपत्ति म. म. मिराशी यांनी लावून दाखविली आहे, तीहि सयुक्तिक दिसत असल्याने ' सातवाहन ' हें शातकर्णीचें कुलनाव नव्हतेंच, असें मी म्हणूं शकत नाही. तरी पण ' सातवाहन ' हें जर आंध्रभृत्यांचें कुलनाव होतें, तर चार पुराणांपैकी एकांतहि त्याचा उल्लेख का नसावा, हें कोडें मात्र सुटूं शकत नाही, अस्तु.

सातवाहन या नावाचा राजा या (आन्ध्र) कुलाचा संस्थापक होता, असा निर्विवाद पुरावा जो त्यांना उपलब्ध झाला आहे, तो म्हणजे त्यांच्या दोन संशोधक मित्रांकडून त्यांना मिळालेली तांब्यांचीं दोन चौकोनी नाणीं होत. त्यांच्या पुढील बाजूवर सोंड वर केलेला हत्ती असून मागील बाजूस ' रञो सिरिवाद - ' अशीं अक्षरें आहेत. पूर्ण नांव ' रञो सिरिसादवाहनस ' (राज: श्री सातवाहनस्य) असें असावें. त्यांतील शेवटलीं दोन अक्षरें जागेच्या अभावीं उमटलीं नसावीं, असें ते म्हणतात. अशा प्रकारचीं शातकर्णी-वगैरे राजांचीं कांहीं नाणीं अकोला जिल्ह्यांतील तऱ्हाळा गावीं त्यांना सांपडलीं होतीं पण आतां सापडलेल्या सातवाहन राजाच्या नाण्यांची घडण व आकार आणि त्यावरील अक्षरें व इतर कांहीं चिन्हें तऱ्हाळ्या नाण्यांपेक्षा फार प्राचीन दिसतात. त्यावरून सातवाहन राजा हा या कुळाचा मूळ पुरुष दिसतो. त्यामुळें त्या वंशांतील कोणत्याहि राजाला सातवाहन म्हणतां येईल, असें तें म्हणतात. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा आहे की, त्यांना मिळालेल्या या नवीन नाण्यांवरून निश्चयपूर्वक असें म्हणता येतें की, पुराणांतील आन्ध्रभृत्य राजांचा मूळ पुरुष सातवाहन नावाचा राजा होता. म्हणून त्याच्या वंशांतील कोणत्याहि राजाला सातवाहन म्हणतां येते. हाल हा त्या वंशांतील होता, हें पुराणावरुन स्पष्ट दिसतें. तेव्हां हाल हा सातवाहन होता, हें निर्विवाद सिद्ध होतें. या नाण्यांतील सादवाहन हा मूळपुरुषच का घ्यावा, नागेघाटाच्या लेखांत आलेला सातवाहन (कुमारो सातवाहनो) तो का घेऊं नये, हें त्यांनी सांगितलें नाही. शिवाय तें नाणें मूळ पुरुषाचें मानल्यास त्याचा काल त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें इ. स. पू. २०० च्या सुमाराचा ठरेल. पण त्या काळच्या लिपींतील ' द ' ची घडण या नाण्यांवरील 'द' च्या अगदीं उलट होती. नाण्यांतील 'द' हा जुना ज दिसतो. ही गोष्ट म. म. मिराशी यांच्या नजरेस आली होती, हें त्यांच्या पुढील वाक्यावरून दिसतें.–' Specially noteworthy are the forms of the cursive d with its curve open on the left. ' हें जें 'द' च्या घटणीचें वैलक्षण्य दिसतें, तें अत्यंत प्राचीन आहे; याला प्रमाण पाहिजे आहे तें त्यांच्या लेखांत नाही. [Journal of the Numismatic Society of India, Page2d—'A coin of king Satvaban,]

मी स्वत: नाणेशास्त्राचा व लिपीशास्त्राचा तज्ञ नसल्याने त्यांचा सिद्धांत बरोबर आहे की नाही, हे पाहण्याचा माझा अधिकार नाही. ते त्या विषयांतील सर्वमान्य असें तज्ज्ञ आहेत; म्हणून त्यांच्याच प्रामाण्यावरून पुराणांतील हाल हा सातवाहन होता, हें मी मान्य करितों; आणि आपल्या पुढील मुख्य प्रश्न सोडविण्याच्या कामीं त्याचा कितपत उपयोग होतो, हेंच पाहतों.

त्या दृष्टीने विचार करितां म. म. मिराशी यांचें संशोधन एरवी कितीहि महत्त्वाचें असलें, तरी आपल्या पुढील प्रश्न सोडविण्याच्या कामीं तें अगदीच निरुपयोगी ठरतें. कारण आपल्यापुढे प्रश्न आहे तो हा की, सप्तशतीकर्ता ' हाल ' हा सातवाहन होता काय ? आणि, संशोधन सांगते की, पुराणांतील हाल हा सातवाहन होय. तो हाल हा सातवाहन असला. तरी त्याने हा हाल सातवाहन होता हें कसें ठरणार ? पुराणांतील हाल हा राजा होता. हें म्हणण्याला जसें हें तांब्याचें नाणें प्रमाण आहे, तसें सप्तशतीचा हाल हा सातवाहन होता, असें म्हणण्याला एक तरी प्रमाण आहे काय ? नाही. उलट

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सप्तशतीचा हाल सातवाहन नव्हता, म्हणजे तो हाल आणि हा हाल ह्या भिन्न व्यक्ति होत्या, असें म्हणण्यालाच प्रमाणें अनेक आहेत. तीं अशीं:—

१ लें—पहिला (म्हणजे पुराणांतील) हाल हा राजा होता. तर दुसरा (म्हणजे सप्तशतीचा) हाल हा रंक होता, हें आताच आपण वर पाहिलें आहे.

२ रें—पहिला हाल हा बौद्धधर्मानुयायी होता, हें त्याच्या कुलांतील पुरुषांच्या नाशिक येथील कोरीव लेखांतील वर्णनावरून स्पष्ट दिसते. त्यांत प्रत्येक लेखाच्या आरंभीं मंगलार्थक 'सिद्धम्' हें पद दिलेलें आहे. शिवाय भिक्षुसंघ, बुद्ध—वगैरेंचे आदरपूर्वक उल्लेख, भिक्षुसंघाकरितां दिलेलीं दानें आणि बांधलेलीं लयनें इत्यादिकां-वरून तो बुद्धोपासक होता, असेंच दिसते. तर दुसरा हाल हा वैदिकधर्मानुयायी होता, हें त्याच्या पहिल्या मंगलाच्या गाथेवरूनच सिद्ध होतें. ती गाथा अशी--

पशुवइणो रोपारुणपडिमासंकन्तगोरिमुह अन्दम् ।
गहि अग्ध पङ्क अं विअ संझा सलिलञ्जलिं नमह ॥
[पशुपते रोषारुणप्रतिमासंक्रान्त गौरीमुखचंद्रम् ।
गृहीतार्थपंकजामिव संध्यासलिलाञ्जलिं नमत ॥]

या शिवाय देवीचें देऊळ, राधाकृष्ण, लक्ष्मी—इत्यादि पौराणिक देवतादिकांचा आदरपूर्वक निर्देश, उलट बौद्ध भिक्षूंच्या दर्शनाची अपशकुनांत गणना—यावरून त्याचें वैदिकधर्मानुयायि-त्वच स्पष्ट होतें.

३ रें—नाशिकच्या शिलालेखांत आलेलें 'सातवाहन' हें कुलनाम सप्तशतीच्या सातशें गाथांपैकीं एकहि गाथेंत एकदाहि आलें नाही. म. म. मिराशी म्हणतात कीं, ४६७ व्या गाथेंत ज्या 'सालाहण' नरेन्द्राची स्तुति आली आहे (" सालाहण नरिन्द्रः), तो सातवाहन हाल राजाच होय. हें कशावरून ?—तर " सातवाहन याचें प्राकृतांत प्रथम 'सादवाहन' व नंतर 'सालाहण' असें रूप झालेलें दिसतें. प्राकृतांत मूळच्या द चा ल होतो, हें गोदानदीच्या सप्तशतींतच आलेल्या 'गोला' या नावावरूनच स्पष्ट होईल. " पण मला वाटतें, ही त्यांची भूल आहे. त्यांची अशी भूल होण्याचें कारण 'सातवाहन' हा शब्द संस्कृत आहे, असें ते समजतात, हें होय. वस्तुतः त्या लेखांतील सर्व विशेषनामें प्राकृतांतच असतां हें एकच नाव संस्कृतांत कसें, अशी शंका त्यांना यावयास पाहिजे होती. परंतु तशी शंका त्यांना आलेली दिसत नाही. त्यांचा तसा चुकीचा समज होण्याला मुख्यतः प्राचीन पंडितच जबाबदार आहेत. कारण त्यांनीच प्रथम 'सातवाहन' हा शद्ब संस्कृत आहे, असें समजून " सातेनयस्माद्ऊढोऽभूत्तस्मात्तं सातवाहनम् । नाम्नाचकार " (इतिकथासरित्सागरे) सात म्हणजे अश्व हें त्याचें वाहन होतें, म्हणून त्याचें नांव 'सातवाहन' पडलें;—इत्यादि निरनिराळ्या विचित्र काल्पनिक व्युत्पत्ति दिल्या आहेत. त्यामुळे 'सातवाहन' हें संस्कृत रूप आहे, असा म. म. मिराशींसारख्या विद्वानांचाहि समज झाला असल्यास आश्चर्य नाही. पण कोणाचाहि कशामुळेहि तसा समज झालेला असो, तो चूक आहे, यांत संशय नाही. खरी गोष्ट अशी आहे की, सातवाहन हा शब्द संस्कृत सप्तवाहन (सप्ताश्व = सूर्य) या शब्दाचें प्राकृत रूप होय. संस्कृत 'सप्त' याचें प्राकृत 'सात' किंवा 'साद' अशी रूपें होतात. माझ्या म्हणण्याच्या समर्थनार्थ प्रमाण शोधण्याला फार दूर जावयास नको. तें नाशिकच्या शिलालेखांतच पुरेसें मिळतें. त्यांतील लेख नं. २६ मध्ये 'सातवाहन'[१] कुल (सूर्यवंश) ? यस पतिठापन

---

१ सातवाहन यांतील 'सात' हें पद 'सप्त' याचें प्राकृत रूप होय, हें " दिवसे सातमे " (सप्तमे) यांतील सातमे या प्रयोगावरून स्पष्ट आहे. तसेंच, 'वाहन' याचा 'अश्व' हाच अर्थ तेथे विवक्षित आहे, हें देखील त्याच शिलालेखांतील 'तिसमुद तोयपीत वाहनस' (नं. २६) या प्रयोगावरून दिसतें. यावरून 'सातवाहन कुल' याचा सप्ताश्व कुल म्हणजे सूर्यवंश असा अर्थ असावा, असें मला वाटतें. तरी विद्वानांनीं त्याचा अवश्य विचार करावा.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करस......सातकनिस,' नं. २५ मध्ये 'सिरिसाद-काणि आनपयति,' नं. ६ मध्ये 'सादवाहनकुले कण्हराजिन,' आणि नं. ४ मध्ये 'सिरियण्ण सातकनिस सँवसरे सात मे ७ हेमन्तण पखे ततिये' अशीं पदें आलीं आहेत. त्यांवरून कोणालाहि स्पष्ट दिसेल की, सातवाहन राजांच्या वेळीं जी प्राकृत भाषा प्रचारांत होती, त्या भाषेंत सप्तचें सात, सप्तवाहनाचें सातवाहन किंवा सादवाहन अशीं रूपें होत होतीं. शिलालेखांतील भाषाहि प्राकृत आहे, हें सर्वमान्य आहे. तेव्हा सातवाहन व सादवाहन हीं दोन्ही 'सप्तवाहन' या संस्कृत शब्दाचीं प्राकृत रूपें होत, हें निर्विवाद सिद्ध होतें.

वरील विवेचनावरून वाचकांना दिसून येईल की, 'सादवाहन' या शब्दाचा देखील 'सालाहण' या शब्दाशी संबंध असणें शक्य नाही कारण 'सप्तवाहन' या संस्कृत शब्दाचें प्राकृत रूप 'सादवाहन' आणि त्याचें म्हणजे प्राकृत रूपाचें पुन: दुसरें प्राकृत रूप कसें असू शकणार? म. म. मिराशी म्हणतात, 'गोदा नदी' या शब्दांतील दचा 'ल' होऊन 'गोला नई' हें जसें रूप झालें आहे, तसेंच 'सादवाहन' यांतील 'द' चा 'ल' होऊन 'सालाहण' हें रूप झालें आहे, असें समजावें. पण तें बरोबर नाही. कारण प्राकृत भाषेंत द चा ल होत नाही परंतु घटकाभर तसा तो होतो, असें मानलें, तरी गोदा हा मूळचा संस्कृत शब्द असल्याने त्यांतील द चा ल होणे कदाचित् संभवेल; पण सादवाहन या प्राकृत शब्दांतील द चा पुन: प्राकृत ल कसा होणार? वस्तुत: 'गोला' हा शब्द मूळचा संस्कृत असून गोदावरी शब्दाचा पर्याय आहे. त्याचेंच 'गोला' हें प्राकृत रूप होय. गोदा शब्दाच्या 'द' ला 'ल' होऊन झालेलें रूप नव्हे. म्हणूनच 'गोदावरी'चें गोलावरी असें रूप होत नाही. 'गोआवरी' गोआअरी किंवा गोदावरी असेंच होतें (हेमचन्द्राचे प्राकृत व्याकरण ८।२।१७४ पहा) * (गोला-गोदावरी नद्यां' वाचस्पत्य 'सच्चं भण गोदावरी-पुढसमुद्देण साहियासन्तो' राजशेखराचा प्रबंध कोश.)

तेव्हा अपभ्रष्ट प्राकृताचेंहि पुन: दुसरें प्राकृत रूप होऊं शकते, याला दुसरें प्रमाण पाहिजे आहे तें पुढे येईपर्यंत त्याचें म्हणणें मान्य करितां येत नाही. आता, हेमचंद्राने "सालाहणंमि हालो" असें म्हटलें आहे खरें. पण त्यावरून, फार तर, त्याच्या काळीं हालाला सालवाहन किंवा शालिवाहनाला हाल म्हणत होतें, एवढेंच सिद्ध होईल. पण 'सालाहणं हें 'सादवाहनाचे' प्राकृत रूप होते, हें कसें सिद्ध होणार? शिवाय, सातवाहनाच्या शिलालेखांत 'सालाहण' हें रूप एकदाहि आलें नाही, हें, आणि गाथेंतील सालाहण या प्राकृत शब्दाचें संस्कृत रूप सर्व टीकाकारांनी 'शालवाहन' हेंच दिलें आहे 'सातावाहन' हें दिलेलें नाही हेंहि विसरता येत नाही. सारांश, सातवाहन व हाल या दोन भिन्न व्यक्ति होत्या, हेंच खरें दिसतें. असो.

सप्तशती कर्ता हा सातवाहनच होता या विषयीं अविचालय असें प्रमाण म. म. मिराशी यांच्या मतें बाणाचा 'अविनाशनम्'–इत्यादि श्लोक होय, असें, त्यांनी तो श्लोक लेखाच्या आरंभी दिला आहे, त्यावरून दिसतें म्हणून त्याचाहि विचार करणें अवश्य आहे. तो श्लोक त्यांनी केलेल्या त्यांच्या अर्थासह पुढीलप्रमाणें आहे.

अविनाशिनमग्राम्यम करोत्सातवाहन: ।
विशुद्ध जातिभि: कोषं रत्नैरिव सुभाषितै ।

अर्थ–'एखादा राजा अत्यंत शुद्ध जातीच्या रत्नांनी खेडेगावांत न होणारा असा अक्षय्य निधि करतो, त्याप्रमाणे सातवाहन राजाने अत्यंत निर्दोष अशा व जातिछंदांत रचिलेल्या सुभाषितांनी अविनाशी सोज्वळ व असा कोश रचिला."

यावर ते पुढे म्हणतात, या "श्लोकांत बाणाने सातवाहनाच्या सुभाषितांची स्तुती केली आहे. हा सुभाषित–संग्रह म्हणजे गाथा सप्तशतीच होय, असें समजलें जातें." पण

---

* "गोला–गोआवरी इतितु गोला गोदा-वरीभ्यां सिद्धम्" (पान ६४-६५)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गाथेंतील ' अग्राम्यम् ' या पदाकडे लक्ष्य दिल्यास हा समज चुकीचा आहे, असेंच दिसून येईल. ' अग्राम्यम् ' हें पद ग्राम्यसुभाषित–संग्रहाची व्यावृत्ति करणारें आहे, हें निर्विवाद आहे. ग्राम्य म्हणजे प्राकृत भाषा हा अर्थ लक्ष्यांत घेतल्यास अग्राम्य याचा संस्कृत भाषा असा अर्थ होऊन सातवाहनाने केलेला अग्राम्यसुभाषितांचा संग्रह म्हणजे संस्कृत सुभाषितांचा संग्रह असा अर्थ प्रतीत होतो. ग्राम्य शब्दाचा प्राकृत भाषा असा अर्थ होतो, हें विल्सनने आपल्या कोशांत नमूद केलें आहे. तो म्हणतो, ग्राम्य; " the Prakrita and the other dialects of India except the sanskrit " यावरून बाणाला अभिप्रेत असलेला अग्राम्यसुभाषितसंग्रह म्हणजे गाथासप्तशती नव्हे, असेंच ठरतें. शिवाय, सातवाहन म्हणजे हाल नव्हे, हें मीं वर दाखविलेंच आहे. तसेंच, ' विशुद्ध जातिभिः ' यांतील 'जाति' शब्दाचा ' जातिछंदांत केलेल्या ' गाथा हा त्यांनी केलेला अर्थ जर बरोबर[1] असला, तर त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे तो कोश (बाणनिर्दिष्ट) गाथा सप्तशती असूं शकत नाही. कारण गाथासप्तशती जातिछंदांत नसून आर्याछंदांत आहे. येथे बाणाने प्रशंसिलेला अग्राम्य म्हणजे संस्कृत सुभाषितांचा दुसरा संग्रह कोणता व त्याचा कर्ता दुसरा सातवाहन कोण, असं जर कोणी विचारतील, तर त्यांना असें सांगतां येईल कीं, बाणानेच ' सातवाहन–नरेंद्राय ददौताम्[2] ' या वाक्यांत निर्दिष्ट केलेला जो राजा सातवाहन त्यानेच केलेला किंवा करविलेला एखादा संस्कृत सुभाषितांचा संग्रह असला पाहिजे, असे त्यांनी समजावे. आणि, तो सातवाहन राजा बहुधा [3]काश्मीरचाच (राजतरंगिणींत वर्णिलेल्या सातवाहनांपैकीं) असावा आणि बाण हा औदीच्य असल्याने त्यांनी प्रशंसिलेला सातवाहन हा दाक्षिणात्य सातवाहनापेक्षा औदीच्यच असणें अधिक संभवनीय आहे. सारांश, बाणाने वर्णिलेला सुभाषित–संग्रह गाथा सप्तशती नव्हे, हेंच खरें.

सातवाहन राजाने गाथा ग्रथित केल्या, असें स्पष्ट सांगणारी दुसरी एक (राजशेखराची) गाथा त्यांनी उद्धृत केली आहे. तिचाहि विचार केला पाहिजे. ती गाथा व तिचा त्यांनी केलेला अर्थ येणेंप्रमाणें:—

" जगत्यां ग्रथिता गाथाः सातवाहन भूभुजा।
व्यधुर्धृतेस्तु विस्तारमहो चित्रपरम्परा ॥

"या जगांत सातवाहनाने गाथा अनेक ठिकाणांहून जमवून एकत्रित केल्या; पण त्यायोगें लोकांचा आनंद संकुचित न होतां विस्तार पावला ! काय ही आश्चर्याची परंपरा ! "

मला वाटतें, हा अर्थ बरोबर नाही. कारणें (१) " अनेक ठिकाणांहून जमवून " या अर्थाचा वाचक शब्द मुळांत नाही. तो त्यांच्या पदरचा आहे. (२) " लोकांचा आनंद " या अर्थाचाहि वाचक शब्द मुळांत नाही. (३) अनेक ठिकाणांहून जमवून एकत्रित केल्या, त्यायोगें लोकांच्या आनंदाने संकुचित का व्हावें, कळत नाही ! अनेक आनंदजनक वस्तु एकत्रित झाल्या असतां आनंद वाढणेंच स्वाभाविक आहे. मग गाथांच्या बाबतींतच तो संकुचित होण्याचें कारण काय ? तें त्यांनी सांगितलें नाही. आणि, तें कळल्याशिवाय तो विस्तार पावण्यांत आश्चर्य कोणतें, हेंहि समजणें कठीण आहे. (४) बरें, आनंद संकुचित होण्याऐवजीं तो विस्तार पावला, हें एक आश्चर्य मानूं. पण त्यांत आश्चर्याची परंपरा कोणती ? ' परंपरा ' म्हणण्याला निदान

---

१ तो अर्थ बरोबर आहे, असें " जगत्यां रचिता गाथाः सातवाहन भूभुजा। व्यधुर्धृतेस्तु- विस्तारमहोचित्रपरंपरा " या पद्यावरून दिसतें.

२ हर्षचरित, निर्णयसागर प्रत. (१९१८) अष्टम उच्छ्वास पा. २५१

३ काश्मीरमध्यें फार पुरातन कालांपासून राजादिकांचीं नावें प्राकृत भाषेंतच असत, हें राजतरंगिणींवरून दिसतें. लेले यांची राजतरंगिणी (मराठी) उपोद्घात पान १० पहा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दोन तरी आश्चर्यें पाहिजेत. पण त्यांच्या अर्थांत दुसऱ्या आश्चर्याचा पत्ता नाही.

माझ्या मतें हा श्लोक द्व्यर्थी असून त्याचा अर्थ असा आहे:–सातवाहन राजाने जगती छंदांत आर्या गुंफल्या, हें पहिलें आश्चर्य; आणि त्यांनी म्हणजे जगती छंदांत गुंफलेल्या त्या आर्यांनी धृती छंदाचा विस्तार केला, हें दुसरें आश्चर्य. या आश्चर्याचा आश्चर्यावर चमत्कार किती हृदयंगम आहे!

दुसरा अर्थ असा:—सातवाहन राजाने गाथा जगतींत म्हणजे पृथ्वीवर निबध्द केल्या, हें एक आश्चर्य. कारण कोणाचेंहि आणि कशाचेंहि निबंधन मर्यादित जागेंत केलें जातें, पण त्याने अमर्याद पृथ्वीवर केलें. अशा प्रकारें निबध्द केलेल्या त्या गाथांनी त्याच्या धृतीचा-धारणेचा जगतीमध्ये विस्तार केला, हें दुसरें आश्चर्य. स्वत: प्रतिबद्ध असलेल्याने दुसऱ्याचा संचार निष्प्रतिबन्ध करणें हें आश्चर्यच होय. म्हणून आश्चर्य परंपरा-श्लोकाचा सरलार्थ हा की, सातवाहन राजाने गाथा जगती छंदांत ग्रथित केल्या. त्या योगें त्याची कीर्ति सर्वत्र पसरली. माझा हा अर्थ बरोबर असला, तर यांत निर्दिष्ट केलेल्या गाथा या सप्तशतीच्या नव्हत, असें सहजच ठरेल. कारण त्या गाथा जगती छन्दांत नसून आर्या छन्दांत आहेत. बरें, तो बरोबर नसला तरी यांतील गाथांशी व हालकृत गाथांशी कांही एक संबंध असूं शकत नाही. कारण त्या गाथांशी व सातवाहनकृत या गाथांशी संबंध दाखविणारा प्राकृत, हाल आणि सप्तशती यांपैकी एकहि शब्द या श्लोकांत आला नाही. शिवाय, सातवाहन आणि हाल हे दोन भिन्न पुरुष होते हें मी वर सप्रमाण दाखविलें आहे. मला तर वाटतें की, या श्लोकांत वर्णिलेला सातवाहनकृत गाथांचा संग्रह आणि बाणाने 'अविनाशिनं'– इत्यादि श्लोकांत वर्णिलेला अग्राम्य सातवाहनकृत सुभाषित–कोश हे एकच होत;[१] आणि जगती छंदाचा देखील जातिछंदांत अंतर्भाव होऊं शकतो, हें लक्ष्यांत घेतल्यास माझ्या या कल्पनेला बरीच बळकटी येते. एवंच, हा श्लोक देखील म. म. मिराशी यांना साथ देत नाही. असो.

वरील विवेचनांवरून सातवाहन हाल आणि सप्तशतीकर्ता हाल हे दोन निरनिराळे पुरुष होते, इतकें निष्पन्न झालें. पण तेवढ्याने आपल्यापुढील मुख्य प्रश्न जो सप्तशतीचा काल कोणता, तो सुटत नाही. तो तसाच शिल्लक राहतो. कारण हे दोन हाल, एक तर, समकालिक असतील, किंवा भिन्नकालिन असतील. ते जर समकालिक असले, तर सातवाहन हालाचा इ. स. चें पहिलें–दुसरें शतक हा जो काल विद्वानांनी बहुमताने निश्चित केल्यासारखा आहे तोच सप्तशतीचा काल होय, असें म्हणावें लागेल. पण ते जर भिन्नकालिक असतील, तर सप्तशतीचा काल दुसऱ्या स्वतंत्र प्रमाणाने ठरवावा लागेल. आणि, तसा काल ठरविण्याचें खरें निर्णायक साधन म्हटलें, तर तिच्यांतील गाथा हेंच होय. परंतु त्यांचाच काल अद्यापि अनिश्चित असल्याचें बेबरचा आधार दाखवून अशा पुराव्यावर भिस्त न टेवणें बरें, अशी म. म. मिराशी यांनी सावधगिरीची सूचना दिली आहे. ती, आरंभीच्या तीन गाथा सोडून मलाहि पटते. तसेंच, गाथांशी संलग्न असलेल्या कविनामांची अविश्वसनीयता दाखवून त्यांच्यावरहि भिस्त न ठेवणें बरें, असें जें वर मीं म्हटलें आहे, तें त्यांनाहि पटेल, असा मला विश्वास वाटतो. अशा स्थितींत पूर्वोक्त दोन हाल समकालिक की भिन्नकालिक एवढें जरी ठरवितां आलें, तरी सप्तशतीचा काल ठरविण्याच्या दृष्टीने पुष्कळच कार्य झाल्यासारखें होईल. म्हणून तेंच ठरविण्याचा मी प्रयत्न करितों.

"आरंभींच्या तीन गाथा सोडून" – असें जें मीं वर म्हटलें आहे, त्याचें कारण, बाकीच्या सर्व गाथांत कितीहि अदलाबदल झालेली असली, तरी पहिल्या तीन गाथा (भुवनपालाच्या टीकेंत दुसरी गाथा गळली असली तरी) मूळच्या अगदी

१ बाणाचाच अभिप्राय राजशेखराने दुसऱ्या भाषेंत सांगितला आहे, इतकेंच.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अविचलित आहेत, या विषयीं मला तिळमात्र संदेह नाही. मलाच तर काय, पण म. म. मिराशी यांना देखील त्याविषयीं संदेह नाही, असें दिसतें. कारण त्यांनीहि आपल्या विवेचनांत त्यांपैकी दोन गाथा (२ री व ३ री) आधार म्हणून घेतल्या आहेत. म्हणून त्यांपैकी नं. २ च्या आधारें माझें अनुमान मी वाचकांपुढे मांडतों. ती गाथा अशी:—

अमिअं पाउअकव्वं पढिउं साउं अजेण जाणन्ति
कामस्स तत्ततन्तिं कुणन्ति ते कहँ ण लज्जन्ति ॥२॥
[अमृतं प्राकृतकाव्यं पठितुं श्रोतुं च येन जानन्ति
कामस्य तत्त्वचिन्तां कुर्वन्ति ते कथं न लज्जन्ते ॥]

अमृततुल्य प्राकृतकाव्य जे ऐकूं-पढूं जाणत नाहीत, तरी कामशास्त्राचा विचार करतात, त्यांना लाज कशी वाटत नाही ? या गाथेंत कामशास्त्रावर संस्कृत भाषेंत ग्रन्थ लिहिणाऱ्या वात्स्यायनाला टोमणा आहे, असें मीं 'वागीश्वरीं' तील माझ्या पहिल्या लेखांत म्हटलें होतें. तें माझ्या त्या लेखांचें परीक्षण करणाऱ्या अप्रबुद्ध व मिराशी या दोघांनाहि मान्य नाही. त्यांच्या आक्षेपांचा मी पुढे विचार करणार आहे. तूर्त मी इतकेंच सांगतों की, मला अद्यापि तें तसेंच वाटतें. ही गाथा लिहिणाराला कामाच्या तत्त्वाचा विचार करणारा वात्स्यायनच अभिप्रेत होता, असें मला वाटतें. अर्थात् सप्तशतीच्या हालाचा काल वात्स्यायनानंतरचा ठरतो. आता, कामसूत्रांत " कर्तर्याकुन्तलः शातकर्णिः शातवाहनो महादेवीं मलयवतीं जघान " असा ' शातकर्णी सातवाहना ' चा उल्लेख आला आहे. हीं नावें पुराणांतील आन्ध्रभृत्य राजांचीं दिसतात. तेव्हा आन्ध्रभृत्य राजे व त्यांतलाच एक म्हणून ' हाल ' देखील वात्स्यायनाच्या पूर्वी होऊन गेला असला पाहिजे. अर्थात् सप्तशतीचा ' हाल ' वात्स्यायनाच्या नंतरचा ठरतो; व ' सातवाहन हाल ' हा वात्स्यायनाच्या पूर्वीचा असल्यानें ते दोघे अगदी भिन्नकालिक होते, असेंच सिद्ध होतें. या अनुमानाला भाषेचीहि पुष्टि मिळते. हाल सातवाहनाच्या उत्कीर्ण लेखांत व्यक्त होणारी प्राकृत भाषा सप्तशतीच्या प्राकृत भाषेच्या मानाने बरीच प्राचीन दिसते. अर्थात् त्यावरूनहि त्या दोघांच्या कालांत बरेच अंतर होतें, असें ठरतें. या गाथेवरून दुसरेंहि एक अनुमान निघतें. तें असें:– ही गाथा त्या काळीं लिहिली गेली असावी की, ज्या काळीं प्राकृत भाषेला व तिच्याबरोबरच तिच्या प्रतिष्ठेला ओहोटी लागली होती. म्हणजे, शिष्टभाषेंतून तिचें उच्चाटन होऊन तिला अशिष्टांच्या अशिक्षित, अडाणी, ग्राम्यजन, स्त्रिया–इत्यादिकांच्या भाषेचें स्थान मिळालें होतें. म्हणजे, प्राकृत ही ग्राम्य भाषा आणि संस्कृत हीच काय ती शिष्ट भाषा, असा सार्वत्रिक समजच नव्हे, तर व्यवहारहि रूढ झाला होता. त्याचें एखादें निर्विवाद गमकच पाहिजे असल्यास संस्कृत नाटकांत निरनिराळ्या पात्रांच्या तोंडीं घातलेली भाषा पहा. या नाटकांत उच्च पात्रांच्या तोंडीं संस्कृत, आणि स्त्रिया व नीच पात्रें यांच्या तोंडीं प्राकृत भाषा घातलेली असते. इतकेंच नव्हे, तर तशा अर्थाचें नियमहि करण्यांत आले होते, हें 'साहित्यदर्पणांतील पुढील कारिकांवरून दिसून येतें.

" पुरुषाणामनीचानां संस्कृतंस्यात्कृतात्मनाम् ।
शौरसेनी प्रयोक्तव्या तादृशीनांच योषिताम् ।
आसामेवतु गाथासु महाराष्ट्रीं प्रयोजयत् । "

—इत्यादि. येथे म. म. मिराशी यांचा माझ्याशी थोडा मतभेद दिसतो. ते संस्कृत नाटकांच्या या प्रवृत्तीवरून महाराष्ट्री भाषेच्या भरभराटीच्या कालाचें अनुमान करितात, तर मी तिच्या ओहोटीच्या कालाचें अनुमान करितों. माझ्या मतें त्यांच्या अनुमानांत, महाराष्ट्री प्राकृत भाषा स्त्रिया आणि नीच पात्रें यांच्याच तोंडीं का, उच्च पुरुषांच्या तोंडीं का नाही, याची उपपत्ति लागत नाही. कांही असलें, तरी महाराष्ट्रीच्या उत्कर्षाचा काल त्या सुमारास संपला होता, एवढी गोष्ट त्यांनाहि मान्य असल्याचें त्यांच्या पुढील विधानावरूनच दिसतें. ते म्हणतात:—" इ. स. च्या पहिल्या पाच शतकांत प्राकृत काव्य–गंगेला पूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आलेला दिसतो." यांतील कालमर्यादा सोडून दिली, तरी तो पूर त्यानंतर ओसरला, असाच त्याचा अर्थ निघतो. तो पूर ओसरल्यानंतरच्याच गाथा (आमिअं इत्यादि) रचली गेली असावी, असें मला वाटतें. त्या गाथेंत प्राकृत भाषेचा अभिमान बाळगणाऱ्या कवीचा त्या भाषेंतील काव्यांना तुच्छ लेखणाऱ्या कोणा तरी संस्कृत भाषेंत ग्रन्थ लिहिणाऱ्या—त्यांतहि कामाच्या तत्त्वाचा विचार करणारा ग्रन्थ लिहिणाऱ्या—अर्थात् त्याच्या मतें शिष्टंमन्य अशा व्यक्तीला उद्देशून संताप व्यक्त झालेला दिसतो. ती व्यक्ति माझ्या मतें कामसूत्रकार वात्स्यायनच होय. हें माझें मत माझ्या लेखाच्या दोन्ही परीक्षकांना मान्य नाही. म्हणून त्यांच्या आक्षेपांचा मी येथे विचार करतों.

गाथेंतील 'कामस्य तत्त्वचिन्तां' या पदांच्या अर्थासंबंधानेच काय तो मतभेद आहे. माझा अर्थ मी वर दिलाच आहे. तो त्या दोघांनाहि कबूल नाही. पण त्यांपैकी एक (अप्रबुद्ध) म्हणतात, "कामाचें तत्त्व म्हणजे स्त्री-पुरुष-प्रेम असा अर्थ करणें येथे युक्त आहे. स्त्री-पुरुष-संयोग-शास्त्र असा अर्थ करणें योग्य होणार नाही." का बरें? 'स्त्री-पुरुष-प्रेम' हा तर नुसत्या 'काम' या प्रातिपदिकाचाच अर्थ झाला. त्यांत षष्ठी विभक्तीचा आणि 'तत्त्वचिन्तां' या पदाचा अर्थ आलाच नाही. म्हणून तो अर्थ त्याला जोडला म्हणजे 'कामस्य तत्त्वचिन्ता' एवढ्याच 'स्त्री-पुरुष-प्रेमाच्या तत्त्वाचा विचार' असा अर्थ निष्पन्न होतो; आणि "एखाद्या गोष्टीच्या शास्त्रांत त्या गोष्टीच्या तत्त्वाचाहि विचार येतो," या त्यांच्याच तत्त्वानुसार 'कामस्य तत्त्वचिन्ता' याचा स्त्री-पुरुष-प्रेमाच्या तत्त्वाचा ज्या शास्त्रांत विचार केलेला आहे, तें शास्त्र (म्हणजे कामशास्त्र) असा अर्थ केला, तर त्याला त्यांची हरकत का असावी? दुसरे परीक्षक (मिराशी) म्हणतात की, त्या पदाचा "कामपुरुषार्थाच्या तत्त्वज्ञानाची उठाठेव" असा अर्थ आहे. पण मी तरी तेंच म्हणतों. भेद काय तो शब्दांचा आहे. ते ज्याला तत्त्वज्ञानाची उठाठेव म्हणतात, त्यालाच मी शास्त्र म्हणतों, इतकेंच. धर्मपुरुषार्थाच्या तत्त्वज्ञानाची उठाठेव जर धर्मशास्त्र होय, आणि अर्थपुरुषार्थाच्या तत्त्वज्ञानाची उठाठेव ही जर अर्थशास्त्र होय, तर कामपुरुषार्थाच्या तत्त्वज्ञानाच्या उठाठेवीनेच असा कोणता अपराध केला की, ज्यामुळे तिला कामशास्त्र म्हणूं नये? एवंच कोणी कितीहि आढेवेढे घेतले, तरीहि या गाथेंत अमृततुल्य अशी प्राकृत भाषा टाकून संस्कृत भाषेंत कामशास्त्र लिहिणाऱ्या वात्स्यायनावरच गाथाकाराचा—हालाचा—कटाक्ष आहे, हेंच एक अनुमान सयुक्तिक दिसतें. असो.

वरील विवेचनावरून इतकें जरी निष्पन्न झालें की, सातवाहन हाल आणि सप्तशतीकर्ता हाल हे दोन निराळे पुरुष होते. पहिला राजा, तर दुसरा रंक होता आणि पहिला वात्स्यायनापूर्वी होऊन गेला, तर दुसरा त्याच्यानंतर किंवा तत्सम कालीं झाला—तरी मूळच्या गाथा कोणत्या, हें कळेपर्यंत सप्तशतीचा काल कोणता, हें सांगतां येणें शक्य दिसत नाही. आणि, तें कळण्याला वेबरनी निवडलेल्या ४३० गाथांची यादी प्रसिद्ध झाली पाहिजे. म्हणून ती प्रसिद्ध होईपर्यंत किंवा मीं आधाराला घेतलेल्या गाथा वेबरने निवडलेल्या ४३० गाथांमध्ये आढळत नाहीत, असें सिद्ध होईपर्यंत मीं ठरविलेला काळ मला बदलविण्याचें कारण दिसत नाही, असेंच शेवटी म्हणावें लागतें.

• • •

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुरुषाचं हृदय

मूळ लेखक : Giorgieri Contri.
अनुवादक : 'शांताराम', एम्. ए.

● Cosimo Giorgieri Contri च्या एका अत्युत्कृष्ट लघुकथेचा प्रसिद्ध तरुण लेखक "शांताराम" यांनी हा अत्युत्कृष्ट अनुवाद केलेला आहे. या तोडीच्या लघुकथा मराठांत कितीशा आढळतील ?

* * *

दारावरील घंटी वाजलेली ग्युग्लिमोला ऐकूं आली; कुणी तरी आंत आलं —आणि त्यानंतर हॉलमधील बोलण्याचा आवाज. तो जागचा हलला नाही. कोण आलं असेल बरं? औषधाच्या दुकानांतला नोकर? ब्रेडवाला? की, मोलकरीण? स्वत:च्या साध्यासुध्या कंटाळवाण्या आयुष्याचा सगळा तपशील त्याला पाठ होता. दररोज घडणाऱ्या त्याच त्या गोष्टींचा तोच तो क्रम, तीच तीच लय— एक यांत्रिक लय, त्याला आपल्या वरच्या अभ्यासिकेंतून बसल्या जागीं ऐकूं येई. आज त्याच्या घरीं घडत असलेला नवा प्रसंग देखील या जुन्या लयींत मिसळून गेला. जणू, त्यांत नवीन असं कांही नव्हतंच; जणू, त्यांत त्याचा विशेष जिव्हाळा नव्हता. त्याचा औषधवाला— हो— तो नवीन होता, ही ईश्वराची एक कृपाच म्हणायची. पण म्हणून जागचं उठायचं तें का? व्हायच्या घटना त्या होणारच. त्यांचा प्रवाह बदलविणं त्याच्या हातीं नव्हतं. ना त्याच्या शब्दांत, ना कृतींत. तो विचार करूं लागला, "थोड्यांच वेळांत सुईण येईल. नंतर डॉक्टर, नंतर आणखी कांही लोक. तास दोन तासांत सगळं संपेल!"

जिवाला लागलेली चुटपूट लपविण्यासाठीं तो वाचूं लागला. वसंत ऋतु असूनहि त्याने बाहेरच्या बागेकडे नजर टाकली नाही. त्याच्या जीवितासारखंच त्याचं वाचनहि बापडं तोकडं होतं. वाचतां वाचतां तो आपल्या आयुष्याचा विचार करूं लागला. वयाच्या पंचविसाव्या वर्षी त्याचं लग्न झालं. आजचं वय तीस··जीवनाची पांच नीरस वर्षं; विशेष सुख नाही, विशेष दु:ख नाही. त्याच्या आईच्या संकुचित आकांक्षा पूर्ण झाल्या होत्या; त्याने होऊं दिल्या. स्वत:चं व्यक्तित्व भासविण्याइतका त्याला उत्साह नव्हता. स्वत:च्या गुणाबद्दल किंवा कर्तृत्वाबद्दल तसा आत्मविश्वासहि नव्हता. चार पोक्त बायांसारखेच त्याच्या आईचे विचार होते. त्याला आपण जन्म दिला, वाढवलं, त्याचं जगांत कसं निभेल, ही आपुलकीची भीति आणि स्वत:च्या जीवनांत झालेला भ्रमनिरास यामुळे आईबापांच्या उपदेशांत नेहमीच हुरहूर व सावधगिरीची सूचना भरलेली असते. त्याच्या आईनेहि असाच सल्ला दिला होता—"तूं आयरीनशी लग्न करून घे. तुला अगदी योग्य आहे ती. तूं लग्न करावं, अशी एवढीच एक पोर दिसते मला. तशी ती सुंदर नसेल—नाहीच. पण तिला बोज आहे. कामाचा उरक आहे.......माहेरचं पण साधारण बरंच येईल. खूप श्रीमंत नव्हे. पण पैशाशीं थोडंच लग्न करायचंय् तुला? नीटनेटका संसार करील ती. मुलंबाळं होतील...... आणखी काय हवं तुला? मृगजळामागे धावण्यांत अर्थ नाही. कळतंच तुला सगळं."

आणि, खरंच त्याने कुठलीहि मोहक कल्पना उराशी बाळगली नाही. आईच्या खुषीसाठी त्याने आयरीनशी लग्न केलं. तिचं सुख म्हणजेच आपलं सुख, या विचाराची त्याने स्वत:ला संवय लावून घेतली.

एक नि:सत्त्व श्रांत सुख—रोग्याच्या स्वप्नसृष्टींतील परिचारिकेसारखं. मृगजळाबद्दल त्याची आई जें कांही बोलली होती, तें सगळं समजून उमजूनच. ग्युग्लीमोला मोहविणारी कल्पना

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणजे ॲना–त्याची आतेबहीण. त्याच्या एका आतेने श्रीमंत व्यवहारचतुर व्यापाऱ्याशी लग्न केलं होतं. लहानपणीं ग्युग्लीमो त्यांच्याकडे पुष्कळदा जायचा. पण तो जेव्हा मोठा झाला, तेव्हा त्याच्या आतेच्या संशयी स्वभावामुळे आणि बदललेल्या सांपत्तिक स्थितीमुळे परस्परसंबंधांत अंतर निर्माण झालं व त्यांच्याकडे जाणं त्याने सोडलं. आणि, ही उंच बांध्याची, गौर खांद्याची, सदैव सुंदर, नेहमी नटलेली–थटलेली छोकरी म्हणजेच त्याला सतत भुलविणारा भास. या आभासाचाच त्याच्या आईने प्रतिकार केला होता. "याच्यासारख्याशी तिला काय कर्तव्य? लग्न?–छे; अशक्य. तिची उडी वरची आहे ····प्रेम? याच्या डोक्यांत नको का यायला की, ती स्वत:चा जीव रिझविण्यासाठी नुसती खेळत आहे. एरवी तिला याची काडीचीहि किंमत नाही."

या शब्दांच्या अप्रतिहत प्रहाराने त्याचं स्वप्न विरून गेलं–जलप्रपातामुळे दगड झिजावा तसं. आणि, म्हणून त्याने आयरीनशी लग्न केलं होतं व त्याला सुखसमाधान......

आता त्या नि:सत्त्व मिळमिळीत सुखानंतर, पांच वर्षांनंतर, आयरीनला मूल होणार होतं. ग्युग्लीमोला त्यांत प्रथम विशेष उल्हास वाटला नाही. त्याला नुसतं एवढंच वाटलं की, इतके दिवस आपली आई आपल्याला सावध करीत होती; आता आपण कुणाला तरी जगांत आणून जगाबद्दल सावध राहायचा उपदेश करूं. पण जसजसे महिने जाऊं लागले, तसतसं, उत्फुल्ल सागर उचंबळून यावा, त्याप्रमाणे, त्याचं हृदय आनंदाने भरूं लागलं. पुत्ररत्न! वंशाचा दिवा! त्याच्या दु:खाची, त्याच्या प्रीतिवैफल्याची, सगळ्याची भरपाई आज होणार होती!

तो विचारतंद्रींतून जागा झाला; अभ्यासिकेंतून उठला; व्हरांड्यांत येऊन उभा राहिला. क्लोरोफॉर्मचा उग्र वास त्याच्या पत्नीच्या खोलींतून येत होता. त्याने जर कान देऊन ऐकलं असतं, तर कदाचित् कण्हण्याचा आवाज सुद्धा त्याला ऐकूं आला असता......पण इतक्यांत अंगणांत कुणाची तरी सावली झळकली. एका भरदार गंभीर आवाजामुळे त्याची एकतानता भंगली. "हा मी आलों बघ. भांबावलेला दिसतोस!"

मागे त्यांच्याकडे नेहमी येणाऱ्या डॉक्टर मित्राचा आवाज होता तो. लठ्ठ, खेळकर, लालबुंद चेहऱ्याच्या या माणसांत, काय असेल तें असो, नवीन नवीन जीव जगांत आणण्याच्या धंद्यामुळे एक जादा जोम आला होता.

"मला कळल्याबरोबर आलों...कशी आहे त्यांची तब्यत? बरी आहे? छान·····उगीच अस्वस्थ होऊं नकोस..... तुझ्या गाजीं आपण असतों, तर बुवा फिरायला गेलों असतों. घरीं राह्यचंच असेल, तर स्वस्थ बैस आपल्या खोलींत. मी येईन की एकदोन तासांत तुझ्याकडे अन् सांगेन कसं चाललंय तें."

डॉक्टर हसत हसत आंतल्या खोलींत निघून गेले. ग्युग्लिमो आपल्या खोलीकडे परतला. बाहेर पडायचा त्याने क्षणभर खरोखरीच विचार केला. पण कसल्याशा अस्पष्ट सहजप्रेरणेने, आनंदाच्या आणि भीतीच्या मिश्र जाणिवेने त्याला बद्ध करून ठेवलं. त्याला आश्चर्य वाटलं; हा आपल्या मनाचा घाबरटपणा की कांहीतरी......

तो आपल्या डेस्कशी येऊन बसला. त्याचे नेहमीचे विचार पुन: मनांत घोळायला लागले. अपत्यजन्माच्या अवसरावर त्याचं जीवन भविष्यांत झेपावूं पहात होतं. तोंच त्याचे हे उफराटे विचार भूतकाळांत जणूं खोल खोल घुसत होते.

भूतकाळ म्हणजे ॲना-सदैव ॲना-ॲना-ती आणि तिचं नांव.

लग्नानंतर त्यानें कित्येकदा ॲनाला बघितलं होतं. तिने अजून लग्न केलं नव्हतं. ती हसून म्हणायची, "मला माझं स्वातंत्र्य हवंय्." आता ती सत्तावीस वर्षांची होती. ती एकटी राह्यची, खूप खूप प्रवास करायची; नेहमीं उद्योगांत असायची; अजूनहि गोड आणि आनंदी दिसायची. ग्युग्लिमोकडे कधी कधी ती येत असे. आयरीनशी तिचं बोलणं हळुवार व सलगीचं असे. एखादद्दुसऱ्या स्मितापलीकडे त्याच्याशी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ती क्वचितच बोलत असे. त्याच्याशी ती हस्तांदोलन करी, तें मित्राचार म्हणून. ग्युग्लिमोला वाटे, एकूण आपल्या आईचा अंदाज विशेष चुकला नव्हता. ॲनाच्या अंगीं फाजील महत्त्वाकांक्षा नसेल कदाचित्, पण प्रीतीची ऊब देखील खचित् नव्हती.

हॉलमध्ये आणखी कांही मंडळींचं आगमन. कुणीतरी मोलकरीणीशी दबलेल्या आवाजांत कुजबुजलं. त्या आवाजानें तो दचकला. नंतर त्याच्या खोलीचं दार उघडलं गेलं. एक सुंदर चेहरा आंत डोकावला.

" मी आहे ग्युग्लीमो. आंत येऊं शकतें का मी ? "

त्याने डेस्कवर आपल्या हातांची असहाय्यपणें चाळवाचाळव केली. जणू, त्याचे विचार त्याला डेस्कच्या कप्प्यांत पार लपवून टाकायचे होते ! अपराध करतां करतां धरल्या गेलेल्या माणसाचे थेट हावभाव ! ॲना पुढे आली, शांत आणि सरळ.

" आयरीनची चौकशी करायला आलें मी. ठीक आहे ना सारं ? "

ग्युग्लीमो तिला त्या वेळीं इतका शून्यहृदय दिसला की, प्रेमळपणें त्याच्याकडे पाहत ती बोलूं लागली " किती काळजींत दिसतोस तूं ! "

" नाही गं, " तो पुटपुटला, " डॉक्टर आहेत की आत. "

आणि, लगेच तिच्या वागणुकींत हृदय आहे व स्वभावांत जीविताची आस्था आहे या कल्पनेने त्याला व्याकुळ केलं; कारण त्याचं मन कातरशितर व निटवलं होतं. मातृत्वाला सुयोग्य अशा तिच्या सुंदर शरीराकडे त्याचं सहजच लक्ष्य गेलं.

" घडीभर बैस ना, ॲना......तूं आलीस हें किती छान झालं. "

सतत बदलतांच संगीताचे सूर नवले वाटावे, तसा त्याचा आवाज तिला निराळा भासूं लागला. विस्मयाने तिने त्याच्याकडे पाहिलं. क्षणभर ती कांहाच बोलली नाही. नंतर तिने विचारलं, " कांही हवंय का ? मी काय करूं शकेन तुझ्यासाठी ? "

उत्तर न द्यायची आता त्याची पाळी होती. तरंग मोठा मोठा होत जावा, तशी त्या दोघांतील स्तब्धता वाढली व तीं दोघं त्यांत गुरफटून गेलीं. अजाणता त्या दोघांना कधी काळीं उच्चारलेल्या आणि आता विसरलेल्या शब्दांची आठवण होऊं लागली. मनांत स्फुरलेल्या, पण ओटांतच विरलेल्या शब्दांचा साद त्यांच्या कानांत घुमूं लागला......अचानकपणे एक प्रश्न विचारून त्या शांततेचा त्याने भंग केला. प्रश्न विचित्र खराच. पण ग्युग्लीमोसारख्या लाजाळू माणसाने विचारल्यामुळे तिला तो अधिकच विचित्र वाटला. एखाद्या अकुशल स्नेहस्पर्शासारखा जाणवला तिला तो.

" ॲना तूं इतकी छान आहेस......तूं अजून लग्न का नाही केलंस् ? "

ती तात्काळ लाजेने चूर झाली. तिचं सगळं मुखमंडळ, फरकॉलरच्या आंतील तिची मान, आरक्त झाली. तिने हसण्याचा प्रयत्न केला, डोळ्यांत आलेले ढग लपविण्याची शिकस्त केली.

" कसला विचार चालवलायस् तूं आता, ग्युग्लीमो ? मी एकटीच राहिलें, कारण–कारण मी कुणालाच नको होतें ! "

" काऽय " ग्युग्लीमो खदखदून हसला देखील. कुणालाच नको ? म्हणजे ? गावांतल्या सगळ्या मुलींच्या मागे नसतील एवढे तरुण तर हिच्या एकटीभोवती घुटमळत होते.

" कुणी सांगितलं तुला ? "

" का, माझ्या आईने. "

" तुझ्या आईला बिचारीला कांही एक माहीत नव्हतं. बरं, तें जाऊं दे. असं समज की, मी त्यावेळीं शपथ घेतली. " ॲना हंसत बोलत असली, तरी तिची विकलता स्पष्ट होती.

शपथ ? पण आपण दोघं लहान होतों, तेव्हा तर तूं निराळाच विचार करीत होतीस..."

"आणभाक पुढे करावयाची असते, ग्युग्लीमो."

" तूं केव्हा केलीस ? "

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" मला नक्की आठवत नाही······असेल कदाचित् पांचसहा वर्षांपूर्वी..." ती थांबली. अधिकाधिक बेचैन होत होती ती. तिने आपले ओठ चावले. ती भलतंच कांहीतरी बोलून गेली होती.

" हो, बरोबर आहे. मला आठवतं, त्यावर्षी तू आजारी होतीस····· आजार कशाचा आहे, हें कुणीच सांगू शकेना···आठवतं, नक्की आठवतं. त्यावेळीं मी आत्रीनसह स्वित्झरलंडमध्यें होतों......मला मागाहून कळलं...आणि..." तो किंचित् हसला व म्हणाला, " तेव्हाच केलास ना तूं निश्चय ? "

" जात्यें मी, ग्युग्लीमो " खांदे उडवीत ती बोलली. " बरं, चालल्यें मी. पुन: येईन मी. फोनवरून कळीव मला कसं काय चालू आहे तें......"

" हो, अवश्य कळवीन. जातांना माझ्याशी हस्तांदोलन नाही का करणार तूं ? "

" घे की. "

तिने आपला हात पुढे केला. त्याने तो धरला आणि तो तसाच घोटाळला—उगीचच, अगदी उगीचच. काय होत होतं तिला !—तिच्या हाताची अशी ही थरथर का ? त्याने तिचा हात दाबला आणि त्याला वाटलं, (क्षणांत उसळलेली, बंधनांच्या पलीकडे जाऊं पाहाणारी एक निश्चित भावना) ती त्याच्या आधीन झाली होती, भारावून गेली होती.

तो एकटा होता. आपण काय बोलून गेलों, आपल्या मनांत कोणता विचार येऊन गेला, हें लक्ष्यांत येतांच तो चकित झाला; घाबरला. त्याला वाटलं, मूर्तिमंत सत्य आपल्यापुढे उभं आहे आणि विचारीत आहे. " कळत नाही का तुला ? "

नाही—त्याला खरोखरच कळलं नव्हतं. त्याने आपल्या आईचं आंधळं मार्गदर्शन स्वीकारलं होतं; त्याच्या आता लक्ष्यांत आलं की, आपण एका उंच कड्याच्या थेट टोकाशी येऊन अडकलों आहोंत. सगळा भूतकाळ आता खऱ्या स्वरूपांत त्याला दिसूं लागला. तो जेव्हा जेव्हा तिच्या भेटीला गेला होता, तेव्हा तेव्हा तिचा चेहरा उजळला होता, चकाकला होता. त्यांच्या गाठीभेटी जसजशा कमीकमी झाल्या होत्या तसतशी तो दु:खीकष्टी दिसूं लागली होती. आणि, त्यानंतर तिने केलेली स्वत:ची आबाळ, इतरा कुणाशीहि लग्न न करण्याचा तिचा हट्ट......पण तिने शब्दांनी एवढसं सुद्धा कधीच का नाही सुचविलं ? – दुखावलेल्या अभिमानामुळे ? की, आपली थट्टा होईल या भीतीमुळे ? नाही— तिलासुद्धा कळलं नव्हतं एकूण.......

आणि आता ? अचानक झालेला हा गौप्यस्फोट !...... आणि, तिचं तें लाजणं; तिचा तो थरथरणारा हात......ॲनाचं अजून त्याच्यावर प्रेम होतं......... " नाही " तो स्वत:शीच म्हणाला, " नाही, तसं शक्य नाही. पण नैसर्गिक जाणिवेच्या निश्चितीने त्याच्या हृदयाचं आतल्या आत शांत, संथ स्पंदन चालूच होतं. " तें खरं आहे, तें खरं आहे. "

एका आर्त विव्हळण्याने त्याच्या विचारमालिकेला धक्का दिला. तो भानावर आला. त्याचं बाळ, प्रत्यक्ष पोटचा गोळा, त्या क्षणीं जन्माला येत होता. भविष्यांत जगायला येत होता. ज्या क्षणीं मुलाच्या रूपाने एक नवा आनंद त्याच्या सान्निध होता, त्याच क्षणीं हा इथं बसून गतसुखाचा विचार करीत होता ! ॲनाचा विचार कांही केल्या त्याला सोडीना. त्याच्या मनांत एक वेडी कल्पना शिरली. एक अप्राप्य आणि हरवलेला, दुसरा प्राप्त आणि निश्चित अशा या दोन्ही महान् आनंदाचा कसातरी संयोग होऊन जर ते एकमेकास पूरक व पोषक ठरले तर··· ?

" ग्युग्लीमो "— डॉक्टर त्याच्यापुढे उभे होते. त्यांचा चेहरा पडला होता. ते गोंधळले होते.

ग्युग्लीमो ताडकन् उठला व पुटपुटला, " काय आहे ? कांही गडबड आहे का ? "

" होय " डॉक्टर गंभीरपणें उत्तरले, " त्यांचा जीव धोक्यांत आहे. ' केस् ' अचानक बिघडली. अजून आशा आहे म्हणा, पण शस्त्रक्रिया करावी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लागेल बहुतेक. तुला सांगितलेलं बरं, असं वाटलं मला······"

ग्युग्लीमो लटलटा कापूं लागला. वेणा आणि वेदना सहन करीत जीवन-मृत्यूशी झुंझत असणाऱ्या पत्नीची त्याला आठवण झाली.

"तुला आणखी कांही विचारायचंय्," डॉक्टर बोलूं लागले, "अशा प्रसंगीं काय करावं, हें तूं आपल्या मनाला विचार. जर समजा...... बाळ किंवा बाळंतीण या दोहोंपैकी मी एकालाच वाचवूं शकलों, तर.....? बोल, कोण हवं तुला ? मूल की, मुलाची आई ?

"काय ?" ग्युग्लीमो ओरडला. मृत्यूची छाया त्याच्याच मुखावर पडली होती जणू. "हो, 'केस्' तशीच आहे. आमचं शास्त्र एकाचा प्राण वाचवूं शकेल. त्याची मी तुला खात्री देतों. पण दोघेहि वाचणं..... विचार कर आणि सांग काय सांगायचं तें."

वीज चमकावी, तसं, निमिषार्धांत त्याचं नवीन जीवन त्याच्या डोळ्यांसमोर उभं राहिलं. त्याला हवं असलेलं नवीन जीवन, नवा आनंद नशीब त्याला देत होतं. दैव त्याला प्रलोभन दाखवीत होतं. पुत्र-त्याच्या जीवनाची आकांक्षा; ॲना-त्याचं सुख. सगळं कांही बदलूं शकत होतं. आयुष्याचा डाव नव्याने मांडण्याची शक्यता त्याला लाभत होती. नीरस श्रांत सुखाऐवजी त्याचं चिरवांछित स्वप्न, सळसळत्या विलासित जीवनाचं स्वप्न, सत्यसृष्टींत उतरत होतं. कर्तव्याबद्दल प्रेम; सवयीबद्दल ओढ त्याला मिळत होती..... आखरीन् गेली की, ॲनाशी विवाह.....त्याने आपला हात पुढे करायाचा व त्याला हवं तें निवडायचाच काय तो उशीर होता. त्याला कोण दोषी ठरविणार ? प्रकृति नियमांप्रमाणे, जीवमात्राच्या गरजेनुसार तो नव्हता का वागणार ?

"अरे देवा !" त्याने हुंदका दिला.

"तुला स्वत:ची पत्नी आवडत नाही" त्याचं हृदय म्हणत होतं, "आणि, जिच्याबद्दल तुला कांहीच वाटत नाही, अशा स्त्रीच्या सहवासांत तूं दिवस व्यतीत करणार ? एकाकी, मुलाबाळांवाचून ? फिरून दुसऱ्यांदा तूं आपलं श्रेय गमविशील···चूक तुझीच···विचार कर··· चल, हो पुढे · फक्त दोन शब्द···इतके का जड आहेत ते ? चल, बोल, मूर्खा, बोल. म्हण-मुलाला वाचवा."

त्याने आपला निस्तेज चेहरा वर उचलला. तो बोलला, तिला वाचवा !"

● ● ●

खरेदी

मूळ लेखक : व्हॅलेंटाईन कटाव्ह.
अनुवादिका : लीला देशमुख, बी. ए.

● व्हॅलेंटाईन कटाव्हच्या सुंदर लघुकथेचा लीला देशमुख यांनी केलेला हा अनुवाद अत्यंत सरस आहे.
मूळ कथा मानवी प्रवृत्तीचा धागान् धागा उकलून दाखविणारी आहे.

★ ★ ★

जार्ज आणि शरका यांचा मे महिन्यांत प्रीतिविवाह झाला. त्यावेळीं हवा मोठी सुरेख होती. नुकतेंच लग्न झालेलं तें तरुण जोडपं रजिस्ट्रेशन ऑफिसमधून बाहेर रस्त्यावर आलं. बाहेर उभा असलेल्या मित्रांनी त्याचं अभिनंदन केलं, हा सगळा अभिनंदनाचा सोहळा आटोपल्यावर शांत, रोड आणि छाती कांहीशी खोल गेलेल्या जार्जनं शरकाकडे पाहत विचारलं,

"आता कुठं जायचं आपण ?"

उंच, देखण्या, परंतु विस्तवासारख्या तापट अशा शरकानं त्याच्या कोटाच्या बाहीला हात घासत आणि नागपुड्या फुगवीत म्हटलं,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" अर्थात् दुकानांत ! खरेदी करायाची नाही काय ? '

" म्हणजे, फर्निचर घ्यायचं होय ? "—असं म्हणून तो हसला; आणि, चालतां चालतां आपल्या डोक्यावरची टोपी त्यानं नीट केली.

बाजारांत जिकडे-तिकडे धूळ होती. दुकानाच्या पुढं मांडून ठेवलेल्या फिक्या रंगाच्या शाली कोरड्या हवेच्या झुळकीनं मागे पुढे होत होत्या. दोन दुकानांतल्या ग्रामोफोनची, अधिक कर्कश कोण वाजवितं, या बाबतींत जणूं स्पर्धा चालली होती ! दुकानांत टांगलेल्या आरशांत वर सूर्याचीं किरणं चकाकत होतीं. दुकानांत ठेवलेल्या सगळयाच आकर्षक आणि सुरेख वस्तु गिऱ्हाईकाचं अंतःकरण वेधून घेणाऱ्या होत्या.

शरकाचे गाल गुलाबी झाले, कपाळावर घाम आला आणि केसांतून फूल खाली गळलं. तिचे टपोरे डोळे आणखीच मोठे झाले. जार्जचं कोपर आपल्या हातानं घट्ट पकडीत, खालचा ओठ दाबीत तिनं जवळ जवळ त्याला रस्त्यांतून ओढत नेलं.

गुदमरलेल्या आवाजांत ती म्हणत होती, " पहिल्यांदा रग घ्यायचा, प्रथम रग. " त्यांनी दोन चौकोनी रग खरेदी केले. ते चांगले जाडजूड होते; परंतु खूप रुंद आणि लांबीला त्या मानानं कमी होते. एक अगदी भडक लाल होता, आणि दुसऱ्यावर फुलांची नक्षी होती.

नंतर आवढा गिळीत नवऱ्याच्या चेहऱ्याकडे पाहत तिनं म्हटलं, " आता चप्पल खरेदी करूं या. तिला लाल टाच हवी; म्हणजे कुणी चोरल्या, तर चटकन् ओळखायला येईल. "

त्यांनी दोन चपलांचे जोड खरेदी केले. दोन पुरुषांचे आणि दोन स्त्रियांचे. त्या सगळयांना खाली लाल टाचा होत्या. शरकाचे डोळे विलक्षण उल्हासानं चमकूं लागले !

नंतर नवऱ्याच्या खांद्याला डोकं घाशीत तिनं म्हटलं, " आता टॉवेल्स ! त्याच्यावर विणलेले कोंबडे हवेत ! " टॉवेल्सच्या जोडीला त्यांनी दोन ब्लँकेट खरेदी केले, एक गजराचं घड्याळ, एक आरसा, कुठल्यातरी जनावराचं चित्र असलेली एक सतरंजी, दोन सुरेखशा खुर्च्या आणि खूपशी लोकर. त्यांना पलंगावर घालायची एक मोठी चादर आणि आणखी पुष्कळच गोष्टी खरेदी करायच्या होत्या; परंतु त्यांच्याजवळ फारसे पैसे नव्हते. हातांत मोठमोठीं पुडकीं घेऊन तीं दोघेंहि परत आलीं. जॉर्जनं दोन्ही खुर्च्या आणि त्या खुर्च्यांनंतर गुंडाळी केलेला रग धरला होता. घामानं त्याचे केस ओले चिंब होऊन कपाळावर चिकटले होते आणि घामाचे ओघळ त्याच्या खप्पड गालांवरून खाली वाहत होते. त्याच्या डोळ्यांखालीं काळीं वर्तुळें होतीं. अर्धवट उघड्या असलेल्या त्याच्या तोंडांतून घाणेरडे दांत दिसत होते आणि मधून मधून त्याला खोकल्याची उबळ येत होती !

घरीं पोचल्यावर सुटकेचा निःश्वास टाकून त्यानं डोक्यावरची टोपी काढली आणि तो खोकूं लागला. तिनं आपल्या हातांतलं सगळं सामान एका पलंगावर टाकलं आणि खोलींत चारी बाजूला नजर फिरविली. आणि, प्रेमानं अल्लडपणें त्याचं मनगट दाबीत म्हटलं.

" चल, चल, फार खोकूं नकोस असा. असा खोकायला लागलास तर लवकरच क्षयानं मरशील ना ? आता माझी सुद्धा तूं काळजी घ्यायला हवीस, नाही कां ? " असं म्हणत तिनं आपले गाल त्याच्या रोड खांद्याशी घासले.

संध्याकाळी पुष्कळसे पाहुणे जमले आणि लग्नाची मेजवानी झाली. त्यांनी खरेदी केलेल्या सामानाचं सगळयांनी कौतुक केलं, स्तुति केली, त्यांच्या लग्नानिमित्त ते व्होडका नावाची दारू प्याले, त्यांनी मिठाई खाल्ली, ते नाचले आणि लवकरच निघून गेले. जसं व्हायला हवं होतं, तसंच सगळं घडलं !

पाहुणे निघून गेल्यावर जॉर्ज आणि शरका यांनी मोठ्या अभिमानानं त्या वस्तूंच्याकडे नजर टाकली. शरकानं मोठ्या काळजीपूर्वक वर्तमानपत्रांनी खुर्च्या झाकून टाकल्या, बाकीच्या वस्तु कुलुपांत बंद केल्या व रग ट्रंकेंत जपून ठेवले. मध्यरात्रीच्या सुमारास शरका एकाएकी दचकून उठली. आणि तिनं नवऱ्यालाहि उठवलं.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" हं, बघ, जॉर्ज, ए जॉर्ज, ऊठ ना " त्याला हलवीत तिनं पुढे म्हटलं, "उठ रे! मला वाटतं, आपण खूप मोठी चूक केली. आपण तो पिवळ्या रंगाचा रग घ्यायला हवा होता. तो याच्या पेक्षाहि जास्त सुरेख होता. आणि, चप्पल सुद्धा भलत्याच खरेदी केल्या, खरं म्हणजे, आपण विचारच केला नाही! त्याला काळसर रंगाची टाच हवी होती; तर मग ते ...अहा! त्या लालपेक्षा सुद्धा छान दिसले असते—खरं म्हणजे, आपण नीट निरखून खरेदी केलीच नाही... "

सकाळीं जॉर्ज आपल्या कामावर निघून गेला. शरका सैपाकघराच्या मागच्या बाजूस उभी राहून शेजारणीशी गप्पा करूं लागली. पाच मिनिटं नवऱ्याच्या प्रकृतीबद्दल गप्पा केल्यावर तिनं त्या बाईला आत खोलींत आणलं, ट्रंक उघडून सगळ्या वस्तु दाखविल्या आणि खरेदी केलेला रग हातांत घेऊन सुस्कारा सोडीत तिनं म्हटलं, " खरं म्हणजे, आम्ही फार मोठी चूक केली! तो पोपटी रंगाचा रग यापेक्षा अधिक छान होता; पण तो खरेदी करण्याचं लक्ष्यांतच राहीलं नाही—खरंच केवढा मूर्खपणा केला! "

तिचे डोळे आणखीच टपोरे होऊन त्यांत पाणी चमकलं.

प्रोफेसरची पत्नी असलेल्या त्या प्रेमळ म्हाताऱ्या शेजारणीनं सगळ्यांची स्तुति केली आणि म्हटलं, " सगळं कसं छान आहे; पण तुझा नवरा पुष्कळच खोकतो. आमच्या घरीं सुद्धा त्याचं खोकणं ऐकूं येतं. तूं त्याची काळजी घ्यायला हवीस. नाही तर—तुला माहीत आहे ना......"

शरकानं जरा उडतच उत्तर दिलं,

" अं,. त्यांत काळजी करण्यासारखं कांही नाही. तो मरत खास नाही; आणि जरी मेला, तरी बिघडतंय कुठे! मी दुसरा नवरा पाहीन! "

परंतु दुसऱ्याच क्षणीं तिचं मन चरकलं.

तिनं आपल्या मनाशी म्हटलं, " अर्थात् मी त्याला पौष्टिक अन्न खायला घालीन. त्यानं खूप खायला हवं. "

* * *

महिन्याच्या अखेरपर्यंत त्यांनी कसेबसे दिवस काढले. जॉर्जचा पगार होतांच ते बाजारांत गेले. आणि पोपटी रंगाचा रग व घरांतील इतर वस्तूंची त्यांनी खरेदी केली. रात्री अंधारांत दिसणारं घड्याळ, वीव्हरच्या फरचे दोन तुकडे, फुलं सजविण्याचा मोठा फ्लॉवरपॉट, अगदी आधुनिक तऱ्हेच्या चपला, फ्रेंटरचा एक सुरेखसा कुत्रा, एक लोकरीची शाल, हिरव्या रंगाची एक छोटीशी ट्रंक आणि त्याला पितळेचं एक सुरेखसं कुलूप.

घरीं आल्यावर शरकानं त्या सगळ्या वस्तु नीट व्यवस्थित नव्या ट्रंकेंत ठेवल्या.

रात्रीं ती परत दचकून जागी झाली. घामानं चिंब झालेल्या नवऱ्याच्या कपाळावर हात ठेवीत तिनं म्हटलं,

" जॉर्ज, झोपलास काय? हे बघ झोपूं नकोस. ए जॉर्ज, ऐकतोस ना?... . तिथं आणखी एक निळ्या रंगाचा रग होता. तो सुद्धा आपण घ्यायला हवा होता. खरंच मोठा सुरेख रग होता तो ....."

* * *

एक दिवस शरकानं आपल्या शेजारणीला म्हटलं, " माझ्या नवऱ्याला सुट्टी मिळते आहे पंधरा दिवसांची सुट्टी घेणार आहे तो; आणखी अर्धा पगार सुद्धा. आम्ही लवकर अगदी तावडतोब एक लोखंडी पलंग घेणार आहों—अगदी नक्की! "

उकडलेले बटाटे थंड पाण्यांत टाकीत त्या शेजारणीनं म्हटलं, " तुला एक सूचना करूं कां? तूं तुझ्या नवऱ्याला एखाद्या चांगल्या सॅनिटोरियम्मध्ये पाठीव. नाही तर मग फार उशीर होईल पहा! "

रागारागानं शरकानं उत्तर दिलं, " त्याला काय होणार आहे? एखाद्या सॅनिटोरियम् पेक्षांहि मी त्याची चांगली काळजी घेईन. मी त्याला तळलेल्या शेवया देणार आहे खायला. खाऊंदे त्याला हव्या तितक्या.

तेव्हां त्या दिवशीं संध्याकाळीं बाजारांतून खूपशी खरेदी करून तीं दोघेंहि परत आलीं. त्यांनी खरेदी केलेल्या पितळेच्या भांड्यांत आपल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उत्साही चेहऱ्याचं प्रतिबिंब पडलेलं जेव्हा शरकानं पाहिलं, तेव्हा तिला मनापासून आनंद झाला. जॉर्ज मात्र खूप थकलेला होता. छातीशी त्यानं निळ्या रंगाची मोठी जाड गुंडाळी धरली होती; त्यावर आपली चिंचोळी हनुवटी टेकवली होती. त्याच्या कपाळाच्या टोकांवर घामाचे मोठमोठाले थेंब जमा झाले होते.

त्या रात्री शरका परत जागी झाली. तिच्या मनांतले विचार तिला कांही केल्या झोप घेऊं देईनात!

तिने हलकेच म्हटलं, ए जॉर्ज, तिथं जांभळ्या रंगाचा एक···ऐकतोस ना रे? काय मूर्ख आहोंत आपण! तोच घ्यायला हवा होता. किती छान होता. अगदी जांभळा—जांभळा, आणि गुलाबी रंगाचे सुरेख काठ. जॉर्ज! या सगळ्यापेक्षा तोच खूप छान होता रे!"

* * *

शरद्‌ऋतूंत एका सकाळीं जॉर्ज, अखेरचा बाहेर पडतांना दिसला. त्या छोट्याश्या गल्लींतून जातांना त्याच्या शरीराचा तोल जात होता. त्याचं लांब अणकुचीदार पातळ नाक त्यानं घातलेल्या जाकिटाच्या कॉलरमागं दडलेलं होतं. त्याच्या रुंद पैजाम्यांतून रोडके पाय सहज दिसत होते. त्याची छोटीशी टोपी डोक्याच्या मागच्या बाजूला बसली होती. घामानं ओले चिंब झालेले केस कपाळावर चिकटून बसले होते.

झोकांड्या खात जातां जातां बूट ओले होऊं नयेत, म्हणून रस्त्यांतील पाण्यानं भरलेले खड्डे तो मोठ्या काळजीपूर्वक टाळींत होता. अशक्त परंतु आनंदी, समाधानाचं हास्य त्याच्या फिक्कया चेहऱ्यावर झळकत होतं. परंतु घरीं आल्याबरोबर त्याला एकदम अंथरुणावर पडावं लागलं; मग शेजारचा एक डॉक्टर आला. शरकानं इन्शुरन्स कंपनीकडे धाव घेतली. ती एकटीच दुकानांत गेली. पण येतांना जांभळा रंग घेऊन आली आणि तिनं तो व्यवस्थित ट्रंकेमध्ये ठेऊन दिला.

जॉर्जची स्थिति हळूंहळूं खालावत गेली. बर्फ पडायला सुरवात झाली. हवा सगळी दमट होऊन गेली. प्रोफेसर आणि त्याची बायको एकमेकांच्या कानाशी लागलीं आणि लगेच दुसरा डॉक्टर आला. त्यानं रोग्याला तपासलं आणि मग तो हात धुण्याकरतां सैपाकघराच्या मागच्या बाजूस आला. धुराच्या वर्तुळांत अश्रु भरल्या डोळ्यांनी शरका उभी होती. स्टोव्हवर ती शेवया तळीत होती. त्या प्रोफेसरच्या बायकोनं आश्चर्यानं म्हटलं, " तुला वेड तर लागलं नाही! तूं त्याला खरोखरच मारशील! तो या तळलेल्या शेवया पचवूं शकेल, असं तुला वाटतं तरी कसं? '

हाताच्या बाहीनं डोळे पुशीत रडत शरकानं उत्तर दिलं, "शेवया खाऊन काय होणार आहे त्याला? कांही होत नाही!"

हात धुतां धुतां डॉक्टरांनी म्हटलं, "यापुढे आता तो कांहीहि खाऊं शकतो '

संध्याकाळच्या सुमारास पांढरा शुभ्र युनिफॉर्म घातलेला दवाखान्यांतला एक माणूस आला. त्यानं सगळं घर जंतुनाशक द्रव्यानं साफ केलं. तो वास घरांत जिकडे-तिकडे दरवळला. रात्रीं शरका दचकून जागी झाली. तिचे डोळे विलक्षण करुण दिसत होते!

तिनं ओढलेल्या आवाजांत म्हटलं," जॉर्ज, जॉर्ज, उठ ना! मला कांही सांगायचं आहे तुला—ए जॉर्ज...... "

परंतु जॉर्जनं उत्तर दिलं नाही. तो अगदी थंड होता. ती अंथरुणावरून उठली आणि अनवाणी पायानं हॉलमध्ये फेऱ्या घालूं लागली. पहाटे तीन वाजण्याचा सुमार होता, पण तिला कांही केल्या झोप येईना.

"तो गेला! गेला!" असं म्हणत तिनं भीतीनं किंकाळी फोडली. "गेला! अरे देवा! मेला की तो—जॉर्ज! विचारा जॉर्ज!"

तिनं रडायला सुरवात केली. शेजारी त्यांच्या दारांतून डोकावूं लागले. हिवाळ्यांतील चांदण्या त्या अंधारांत चमकूं लागल्या.

सकाळीं शरकाचं लाडकं मांजर तिच्या खोलीच्या दाराशी आलं. दार ढकलीत त्यानं आंत तोंड घातलं; आणि त्याच्या अंगावरचे केस

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ताठ उभे राहिले. त्या खोलीच्या मध्यभागीं शरका बसली होती. तिचा सगळा चेहरा आसवांनी भरून गेला होता. ती रागारागानं शेजारणींना म्हणत होती, " मी त्याला म्हणत होतें, तूं शेवया खा ! परंतु तो खात नव्हता. मी केलेल्या सगळ्या शेवया पहा तशाच पडलेल्या आहेत ! मी आतां काय करूं त्याचं ? आणखी गाढवा ! मला एकटीला सोडून कशाला गेलास ! माझ्या शेवया खाल्ल्या नाही आणि एकटाच चालला गेला !...... बिचारा जॉर्ज ! "

त्यानंतर शरका कांहीं दिवस दुःखी दिसत असे. नंतर हळू हळू सगळं पूर्वी सारखं घडूं लागलं. शरकानं परत नोकरी धरली. हिवाळ्याच्या सुमारास तिला पुष्कळांनी मागणी घातली परंतु तिनं नकार दिला. शांत स्वभावाच्या माणसाची ती वाट पहात होती. बाकीचे सगळे जणूं तिच्या जवळ ज्या वस्तू होत्या, त्याच्या लोभानं तिला मागणी घालीत होते !

हिवाळ्याच्या अखेरीस ती फार रोड झाली आणि काळ्या लोकरीचा गरम झगा घालूं लागली. परंतु तो तिला छान दिसत असे. तिथल्या एका गॅरेजमध्ये इव्हान नावाचा एक ड्रायव्हर होता. मोठा शांत, विचारी आणि दयाळू. तो शरकाच्या प्रेमांत पडला आणि वसंत ऋतुच्या सुमारास तीहि त्याच्यावर प्रेम करूं लागली.

हवा मोठी छान होती. रजिस्ट्रारच्या ऑफिसमधून बाहेर आल्यावर तिथं जमलेल्या मित्रांनी त्यांचं अभिनंदन केलं आणि नुकतंच लग्न झालेलं तें तरुण जोडपं रस्त्यावर आलं.

किंचित् लाजत शरकाकडे पाहत तरुण इव्हाननं विचारलं, " आता कुठं जायचं आपण ? "

ती त्याच्या जवळ सरकली. आपल्या केसांतल्या फुलानं त्याच्या कानाला तिनं गुदगुल्या केल्या. नाकपुड्या फुगवीत तिनं अखेरीस म्हटलं, "अर्थात् दुकानांत! खरेदी करायची नाही काय?"

—आणि, क्षणांत तिचे टपोरे डोळे उत्साहानं चमकले !

● ● ●

मी निराळी नाही !

★

मूळ लेखिका : फ्रेडा बेदी.
अनुवादक : केशव केळकर, बी. ए.
संपादक, 'मातृभूमि'

● पंजाबचे समाजवादी पुढारी भाई बेदी यांच्या युरोपियन पत्नी फ्रेडा बेदी यांच्या 'Your people shall be my people' या लेखाचा हा अनुवाद 'Behind the mud--walls' या संग्रहांतून रा. केशव केळकर यांनी केला आहे. केळकर हे उत्तम लघुकथा लेखक असून 'मातृभूमी'चे संपादक आहेत.

हिंदी माणसाशीं विवाह करून हिंदुस्थानला स्वदेश मानणाऱ्या फ्रेडा बेदी यांचे हें आत्मनिवेदन जितकें मनोरंजक तितकेंच उद्बोधकहि आहे.

★ ★ ★

माझी शाळा संपून एक आठवडा लोटला नाही, तों ऑक्सफर्डच्या त्या अंधाऱ्या नोंदणी-कचेरींत माझं लग्न झालं. नोंदणी-अधिकाऱ्याचा चेहरा जरा आंबटच दिसला ! रिवाजाप्रमाणे आमच्याशी हस्तांदोलन करण्याचें त्याने मुद्दामच टाळलं ! माझ्या मातापित्यांसह आम्ही बाहेर आलों, तेव्हा मुसळधार पाऊस कोसळत होता.

आमच्या लग्नदिवशीं असं उदासवाणं असावं ! माझी चर्या बदलून गेली. 'त्यांत काय झालं ?'—बेदी म्हणाला, 'हिंदी वधूच्या दर्शनें पाऊस हा शुभचिन्हच आहे !'

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि, शुभ-शकुनाचा तो ठरलाहि! सामाजिक रूढीनें आमचं लग्न अपेशी ठरणार होतं. दोन सहाध्यायी परस्परांच्या प्रेमांत गुरफटून गेले. त्यांनी वर्ण, वंश पाहिला नाही. परस्परांच्या सुखामध्येच धार्मिक विरोध त्यांनी विलीन करून टाकला. न्याय आणि स्वातंत्र्य यांसाठी त्यांनी आपल्या प्रेमावर लग्नाचें शिक्कामोर्तब केलें!

एकीकडे ही हर्षप्रद भावना! तर दुसरीकडे एकट्यालाच पुरेशा शिष्यवृत्तीवर आणि मदतीवर उभं कॉलेजचं वर्ष पुरें करायचं होतं, ही कष्टमय जाणीव! त्यानंतर हिंदुस्थान गाठायचं. भवितव्यांत काय होतं, कुणास ठाऊक! जगाच्या दृष्टीने तो एक वेडेपणाचा प्रकार होता. आर्थिक सुरक्षा, सामाजिक वा जुनी धार्मिक रूढींची बैठक नाही. आमच्या दृष्टीने आम्हा दोघांत जें चांगलं होतं, त्याच्या लोभानें आम्ही हा समन्वय केला होता.

या वेळ्च, पण सुखकर व भवितव्याविषयीं सारीच अनिश्चितता असलेल्या वैवाहिक आयुष्यांतील पहिल्या वर्षाच्या शेवटीं एक नवी अडचण उत्पन्न झाली. मोठे काळेभोर डोळे असणाऱ्या एका राजसराण्याला मी जन्म दिला!

एकोणवीसशे चौतीसच्या शरद्ऋतूंत आम्ही हिंदुस्थानांत आलों. रंगा त्यावेळीं चार महिन्यांचा झाला होता. बोटीवर मला एकच काम होतं रंगाच्या व्यवस्थित दिनक्रमाला जपायचं. त्याची झोप, त्याचं खाणंपिणं सारंच कांही व्यवस्थित व्हावं, हें मी पाहत होतें. पण तें जमणं कठीण होतं. कांही देखण्या हिंदी विद्यार्थिनींचा घोळकाचा घोळका त्याला चोंबाळायला सदैव तयारच असायचा. कांही पूर्वेकडे प्रथमच यायला निघालेल्या मिशनरी बाया पण होत्या. डेकवर कुठे कोपऱ्यांत मी रंगाला व्यवस्थित कपड्यांत गुंडाळून आणून ठेवलं की, त्या साऱ्या तिथं गोळा व्हायच्या, आणि मग त्यांच्या-त्यांच्या गोष्टी सुरू झाल्या की, गुलाम त्यांच्याबरोबर हसत खिदळत असायचा!

बोटीवर राष्ट्रांतरीच लग्नें झालेलीं तीन जोडपीं होतीं. एका अमेरिकन बाईनें एका बंगाली माणसाशी लग्न केलं होतं. म्युनिचहून एक जर्मन मुलगी बंगालमध्ये आपल्या बंगाली पतीकडेच चालली होती. "माझी मुलगी मी म्युनिचमध्ये माझ्या आईजवळच सोडून आलें आहे. तिला हें सारें नवें वातावरण मानवलें असतें की नाही, ही भिती मला होती. मी आतां घर थाटलं की, तिला बोलावीन" ती म्हणाली, कुणास ठाऊक, त्यांची आता पुन: भेटगाठ तरी होते का! माझ्या मनांत आलं. तिसरी बर्लिनमधील मुलगी होती. तिनें एका चिनी मनुष्याशी लग्न केलं असून ती शांघायला चालली होती.

माझं लग्न झाल्यापासून मी साडी वापरीत असें. (या साड्या वेदीच्या नातलगांनी व मित्रांनी लग्नाचा अहेर म्हणून पाठविल्या होत्या.) त्यामुळें मुंबईला जेव्हा पोहोचलें, तेव्हा वरवर तरी अगदी घरीं आल्यासारखं मला वाटलं. बंदराबद्दल मी मनांत आधी कल्पना केली, अगदी तसं होतं तें. कुलींची धावपळ आणि मित्रांचे हसतमुख चेहरे. हवा किंचित दमट व गरम होती.

तिथून तडक वेदीच्या पंजाबी कुटुंबांत प्रवेश! आम्ही पोचलों, तेव्हा रात्रीचे ११ वाजले होते. प्रवासानंतर मला कसं शिणल्यासारखं व अस्वच्छ वाटत होतं. साधी सुती पांढरी साडी प्रवासांत अगदी उपयोगाची नाही, आणि रंगाचं करतांना तर ती फारच खराब झाली होती. आता एक चांगली तणावून न्यावीशी वाटत होती!

स्टेशनवरून मोटारींत आम्ही जे आलों, ते एका अरुंद पण गजबजलेल्या बाजारांत उतरलों. अरुंद व अंधाऱ्या जिन्यानें वर गेल्यावर मग मात्र एका खूप मोठ्या प्रकाशाच्या मागोमाग वरेच खांब असलेल्या दिवाणखान्यांत येऊन पोहोचलों. भिंतींना नवा रंग दिला होता. मोठींमोठीं वचनें व तसबिरी यांनीहि त्या सजविल्या होत्या. जिन्याच्या टोकाला एका हसतमुख बाईनें आमच्या गळ्यांत मोटमोठे शेवंतीचे हार घातले. एक मंद सुगंध आमच्या भोंवतीं दरवळूं लागला.

माझ्या वेदीची आई पंजाबी थाटाच्या पांढऱ्या शुभ्र पेहेरावांत सामोरी आली. तिची चण किंचित् स्थूल, पण दिसायला तीं फार रुबाबदार होती. वेदीनें तिच्या चरणांना स्पर्श केला. मला किंचित्

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अवघडल्यासारखें झालें, पण मीहि त्याचेंच अनुकरण केलें. पण जेव्हा साश्रु नयनांनी आमच्या दोघांकडे पाहून तिने हास्य केलें व आम्हाला व रंगाला अगदी घट्ट आलिंगन दिलें, तेव्हा माझा संकोच कुठच्या कुठं पळाला!

वेदीला व त्याच्या भावाला ज्याने सांभाळून मोठे केलें, त्या 'पंडितजी' नावाच्या वृद्ध नोकराने रंगाला आपल्या जवळ घेतलें. भोवतालचे हें नवें वातावरण पाहून रंगा जागा होऊन रडत होता. पण पंडीतजींनी नेऊन त्याला पाळण्यांत घातलें. थोड्याच वेळांत तो झोपी गेला.

दिवाणखान्यांत पुष्कळच मंडळी गोळा झाली होती. आणि, मी जरा बावरूनच गेलें होतें. बाहेर कुठेतरी चौघडा वाजत होता, व त्याबरोबरच कुणीतरी गात होतं. आम्हाला दिवाणखान्याच्या मध्यभागी नेऊन एका गालिच्यावर माझ्या सासूच्या समोर बसविण्यांत आलं. तिने माझ्या खांद्यावरून एक चाकोलेट रंगाची मोठी शाल,-पुढे तिची दोन टोकें पसरतील अशी-घातली. आणि, मग— वेदीच्या अनेक नातलगांनी वधूला देण्याचे मिठाईच्या टोपल्या, पैसे आदि—अहेराचे प्रकार तीवर ठेवले. आम्हाला आशीर्वाद देण्यांत आला. आणि मिठाई व पैसे एका लाल कापडांत बांधून ठेवले. अशा समारंभाने आमचें स्वागत होईल, अशी आम्हाला कल्पना नव्हती!

त्यानंतर आम्ही आंतल्या घरांत गेलों व तिथे वेदीच्या आत्या, चुलते, पुतणे यांनी आमचे मनःपूर्वक स्वागत केलें. आम्ही दिवाणखाना सोडतांच बाहेरचे जे लोक भेटायला आले होते, ते हळूहळू गेले. बाहेरचा चौघडा अजूनहि ऐकूं येत होता. सकाळीं सहापर्यंत मग तो थांबलाच नाही! पुरुषमंडळी माझ्याशीं इंग्रजी बोलूं शकत होती. पण माझी सासू व इतर स्त्रियांशी मला बोलतां येईना! पण कसंहि असलं तरी त्या साऱ्यांच्या नेत्रांत प्रसन्नता विलसत असलेली दिसत होती. या 'घरीं येण्याने माझें अंतःकरण हलून गेलें होतें. माझी खात्री आहे, दुसऱ्या एखाद्या बालबोध आणि त्यांच्याच पैकी वधूचें इतकें प्रेमाने व सहानुभूतिपूर्वक स्वागत झालें नसतें!

पुढचे कांही दिवस फार मजेंत गेले. मला सगळं गांव, गांवांतल्या बागा दाखविण्यांत आल्या. लहानापासून थोरापर्यंत सर्व नातलगांच्या भेटीगाठी झाल्या. त्या सर्वांत रुबाबदार अशी जर कोणी व्यक्ति असेल, तर ती वेदीच्या वृद्ध आजोबांची. त्यांचें जुने कर्मठ, पण विशाल अंतःकरण हें त्या कुटुंबाच्या खऱ्या स्वरूपाची ओळख करून देण्यास पुरेसें होतें. स्वच्छ पांढरें सुती कपडे घातलेली व मांडी घालून बसलेली ती सात्त्विक, भव्य मूर्ति पाहिली की, आदरातिशयाने मन उचंबळून येई! त्यांनीहि मला आशिर्वाद दिला व 'शकुन' म्हणून कांही रुपये हातावर ठेवले.

एकदा सुद्धा कधी आपण या घरांत परके आहोंत, असं मात्र मला वाटलं नाही. आम्ही सर्वजण एकत्र जेवीत असूं. आल्या दिवसापासून घराची सुख-समृद्धी वाढविणारी लक्ष्मी म्हणूनच ते माझ्याकडे पाहत होते. पहिल्या दिवसापासून माझ्या सासूने मात्र अगदी ममतेने वागविलें. आणि, मी तिला 'हिंदुस्थानांतील माझी आई' समजूं लागलें. अत्यंत श्रमपूर्वक मला पंजाबी भाषा शिकविण्यास तिने प्रारंभ केला. मला तिने एक जरीकाठी जांभळी साडी नेसायला दिली. इतर स्त्रियांनी मला पंजाबी पोशाख दिला. सलवार, कमीज आणि सोनेरी काठाचे दुपट्टे सारं कांही माझ्या पुढ्यांत पडलं. घरांतलीं सर्व उंची पक्वान्नें माझ्याकरता त्या दिवशी बनविण्यांत आलीं होतीं.

पहिल्या वर्षी आम्ही एकत्र कुटुंबांत राहत होतों. आमच्याखेरीज माझी सासू, दीर आणि त्याची बायको-येवढी माणसं घरांत होतीं. त्या एका वर्षांत भारतीय राहणी आणि विचारसरणी यांविषयीं बरंच ज्ञान मीं पैदा केलं. तो एक मनोरंजक, व तितकाच महत्त्वाचा अनुभव होता. अर्थात् स्वतंत्र राहणीची सवय असणाऱ्या व्यक्तीला त्या एकंदर वातावरणांत जितकं अवघडल्यासारखं व थोडंफार त्रासदायक वाटेल,

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तितकं तें मलाहि वाटलं, हें मी कबूल करतें ! पण तरीही तो अनुभव सुखाचा होता, समाधानाचा होता. वेगवेगळ्या घरांत राहलों असतों, तर आमची कदाचित् ओळखहि पटली नसती ! पण आता एकत्र राहिल्याने आम्हाला परस्परांच्या अंतरंगाचें सौंदर्य कळून चुकलें होतें. भोवतालीं सतत बोलली जाणारी भाषाहि मी लवकरच अवगत करून घेतली.

आज माझ्या लग्नाला दहांहून अधिक वर्षे लोटून गेलीं आहेत. देशांतील हजारों इतर कुटुंबांप्रमाणे आम्ही कालक्रमणा करीत आहोंत. रूथच्या त्या अर्थगंभीर उक्तीप्रमाणे 'तुम्ही सारे माझे लोक आहांत,' 'परमेश्वर सर्वत्र सारखाच आहे,' 'तुझा परमेश्वर तो माझा परमेश्वर'—या भावनेने मी नांदत आलें आहें ! माझ्या सासूमधील व माझ्यामधील अकृत्रिम स्नेहभाव जसजसे दिवस मागे गेले, तसतसा वृद्धिंगत झाला आहे. आता आम्ही एकमेकींशी परस्परांना समजेल अशा एकाच भाषेंत बोलतों, एकमेकींची थट्टा करतों. अनेक वादळांतून आम्ही परस्परांना बिलगून मार्ग काढला आहे. तिच्या एका फार मोठ्या आजारांतून तिची जिवापाड शुश्रूषा करून मी तिला वाचविलं. माझ्या दुसऱ्या बाळंतपणांतून तिच्याच साहाय्याने माझी सुटका झाली. माझं हें दुसरं मूल कांही महिन्यांतच कालवश झालं.

इतक्या कालावधींत एक संस्मरणीय प्रसंग माझ्या डोळ्यापुढून कधी हालत नाही. लग्नानंतर दोन वर्षांनी माझी खरी आई इंग्लंडहून मला भेटावयास आली होती. ती परत जायला निघाली होती, त्या दिवशीचा प्रसंग ! माझ्या सासूचा निरोप घेतांना आईचे डोळे भरून आले होते. ती म्हणाली, 'फ्रेडाला तुमची काळजी घ्यायला सांगा.' त्यावर उत्तर आलं, 'तिला सांगा, ती माझीच मुलगी आहे ! माझ्या पोरापेक्षाहि माझा लोभ आहे, तिच्यावर !" आणि, मग दोघींचीहि अंतःकरणें भरून आलीं व त्या शोकावेगांतच त्यांनी एकमेकींचा निरोप घेतला !

रंगा आता मोठा झाला आहे आणि शाळेंत जाऊं लागला आहे. त्याची ऐट वाढली आणि 'उल्हास'—जीवनाचा उल्हास—तर त्याच्या प्रत्येक हालचालींतून ओसंडत असतो. तो आपल्या आजीला भेटायला खेड्यावर जातो. म्हशींच्या भोवती तो घोटाळत असतो, झाडावर चढतो, उसाचे करवे मजेंत खात बसतो, जत्रेला जातो, तट्टावर बसतो, झाडावरील मोहोरांचे इवलेसे आंबे बनत असतांना ते तो लक्ष्यपूर्वक पाहत असतो. खेड्यांतील मुलांशी त्याने दोस्ती केली आहे, आणि ज्यांतून हिंदुस्थानचे मोठमोठे हॉकीचे खेळाडू तयार झाले, तो विटीदांडूचा खेळ तो त्यांच्याबरोबर खेळतो, लंगडाव खेळतो. तो त्यांच्यापैकीच एक आहे. भारताचा एक सन्मान्य पुत्र—हिंदुस्थानी पुत्र—म्हणून तो आमच्या दृष्टीच्या निवाऱ्याखाली वाढतो आहे.

आणि, इंग्लंड !—इंग्लंडचं म्हणून जें कांही आहे, तें तें सारं—माझ्या आयुष्यांत आता कुठं आहे ? या देशांत येऊन आता मला दहा वर्षे होत आलीं. पण वरवर कितीहि वाटलं, तरी मी त्या देशाला विसरलें नाही. माझीं पत्रें नियमित येत असतात. लहानपणच्या आठवणी जितक्या समृद्ध व अविस्मरणीय असतात, तितक्याच—डर्बिशायरच्या त्या उंच पठारांच्या व दगडी तटबंदींच्या आठवणी माझ्या मनांत कायम आहेत ! तें विशाल समुद्राचें फेसाळतें पाणी, त्यांतले ओहोटीच्या वेळचे ते उघडे बोडखे खडक—आणि समुद्र—त्या समुद्राची आठवण मी कधीहि विसरणार नाही. माझें घर, घरांत त्या काढलेलें तें रम्य कौटुंबिक जीवन, आई, भाऊ, वडील, शाळेच्या मैत्रिणी ! ऑक्स्फर्ड व कॉलेजांतील स्नेही मंडळी, हिमाच्छादित पठारावरची ती भ्रमंति, इफलीमधील नदी, त्या भोवतालची फुलांच्या ताटव्यांची लांबचलांब रांग ! तें माझें शैशव, तारुण्याच्या उमलत्या अवस्थेचा तो बहार ! माझें त्यावेळचे सारें जीवन त्या छोट्या—मोठ्या—गोष्टींनी व्यापून टाकलें होतें !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आता हा भारतवर्ष! या भारतवर्षांत मी एक स्त्री या नात्याने वावरलें, माझें गृहिणी-जीवन मी इथे नांदलें! आता हेंच माझें घर आहे, माझें भलेंबुरें आता इथेच घडावयाचें आहे!

या भारतवर्षाशी मी एकरूप होऊन गेलें आहे! तसंच म्हटलं, तर मी पूर्वी होतें तशीच अगदी जशीच्या तशी तीच आहे. मुळांत माझ्यांत या देशाने तसें कांही परिवर्तन घडवून आणलें नाही. लोकदृष्टीने मी एक भारतीय आहे. पण हा दोष 'भारतीय', 'इंग्रज' अशी जीं भिन्नतादर्शक 'लेबलें' आम्ही निर्माण केलीं, त्यांचा आहे. आम्हीच ही राष्ट्रें निर्माण करीत असतों. मी इंग्लंडच्या कुशींत जन्म पावलेली, मी इंग्लंडच्या धूलिकणांची मिळून झालें आहे. आज मी हिंदी राहणीने वागतें, हिंदी पेहेराव करतें, पण ज्या देशाला आता मी माझं म्हणून मानलें, त्यांत आणि माझ्यामधे कुठलाच महत्त्वाचा व मानायचा असा फरक वाटत नाही. कारण पूर्वग्रह, वरवरचीं 'लेबलें' वा वर्ण यांच्यापेक्षाहि खोल असें कांही चिरंतन तत्त्व आहे, अशी माझी श्रद्धा आहे, आणि प्रेम हें त्यापैकीच एक आहे.

माझं लग्न त्याच भावनेवर विसंबून झालं. प्रेमाला वर्ण-वंशाच्या मर्यादा नाहीत, अशीच आमची भावना होती. या कृत्रिम अडचणी मनुष्य-निर्मित आहेत, परमेश्वराने घडविल्या नाहीत. मला पुष्कळदा विचारण्यांत येतं की, हिंदी घरांत तुझं कसं काय स्वागत झालं? उत्तर सोपं आहे—सहजपणें! कदाचित् पंजाब हा इतर प्रांतापेक्षा कमी कर्मठ असावा, कारण त्याच्याशी परकीय लोकांचे जास्त संबंध आले आहेत, असं कांहीना वाटलें पण तसं नाही. मी जिथं कुठे गेलें तिथे मला अनेक मित्र मिळाले, आणि माझ्या लग्नामुळे कुणी माझा अपमान केला, वा माझ्याकडे तुच्छतेने पाहिलं, असं कधी घडलं नाही!— हें विधान वरचं धाडसाचं आहे. पण तितकंच खरं आहे!

आणि, केवळ सुशिक्षितांत मला असं मोकळं वाटत होतें, असंहि नव्हे. उलट आजचं उथळ शालेय शिक्षण घेणाऱ्या नव्या पिढीपेक्षांहि मला खेड्यांतील अप्रबुद्ध स्त्रिया फार आवडल्या. कधी कुठं रस्त्यांत एखाद्या खेडवळ स्त्रीची माझ्या मुलासकट माझी गाठ पडली की, माझ्या मुलाकडे पाहून ती एक प्रेमळ हास्य करी, आणि मग आम्ही एकमेकींच्या चटकन् मैत्रिणी बनत असूं! खेडवळ, अशिक्षित लोकांत मनाची एक अभिजात ऋजुता असते. ते तुम्ही काय आश्वासन देता, यावरून तुमची पारख करीत नाहीत. त्यांची अंत:करणाची ओळख वेगळीच असते! तुमच्या भावना ओळखण्याची एक उपजत शक्ति यांच्यामध्ये असते. सतत वावदुकगिरीने त्यांची नाजूक भावनाशक्ति बथ्थड झालेली असते. त्यांची एखाद्या खेडवळ स्त्रीच्या रोखून पाहण्यानं सहज चलबिचल होईल, त्यांना संतापहि येईल. पण तसं पाहणं हा उद्धटपणा मानण्यांत चूक होईल. खेड्यांत कुणीहि नवं माणूस आलं, तर त्याची टेहळणी अशीच होईल—नव्या वधूची तर अर्थात्च! पण नव्या माणसाला आपल्यांत ओढण्याचा तो एक मनोज्ञ प्रकार आहे! थोरा-मोठ्याला दुरूनच पाहायचं, त्याचं दर्शन घ्यायचं, त्याच्याशी उर्मटपणें बोलायला लागायचं नाही, ही भारतीय रीत अशा सुसंस्कृत भावनेचाच एक निराळा आविष्कार आहे.

जे खेडवळ हे असे मुखस्तंभ वाटतात, त्यांच्यापेक्षाहि या वावदुकपणाने आमचीं मनें बोथट झालीं आहेत! एक स्त्री आणि दुसरी स्त्री, एक माता आणि दुसरी माता यांच्यांतील समजूत ही शब्दातीत, उपचारातीत असते! सारख्या आशा, समान सुखदु:ख, एक प्रार्थना असलेल्या त्या स्त्रियांमधील ही सहवेदना अश्रुदेखील यथार्थपणें व्यक्त करूं शकत नाहीत, म्हणूनच ती तितकी मूक असते.

युरोपीय वधूंनी हिंदी लोकांशी लग्नं केलीं आहेत आणि संसार थाटले आहेत, अशा पंजाबांत अनेक कुटुंबें सापडतील. कांही लग्नें होऊन मुलेंहि वयांत आलेलीं आहेत, तशीं कालपरवा लग्नें झालेलींहि आहेत. मी त्या मंडळीपैकी एक आहे, पण त्यांच्यापैकीं कितींची अशी

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माहिती मला आहे? मी या इथल्या लोकांतच दंग होऊन गेले आहे!

पण मला माहीत असलेल्या लग्नांपैकी कित्येक सुखी झालेलीं आहेत, आणि त्या स्त्रिया इकडील वातावरणांत पार मिसळून गेल्या आहेत. कांही लग्नं अयशस्वी झालीं, त्या संसाराचा अगदी विचका झाला! पण जगांतील प्रत्येक समाजांत अशीं उदाहरणें सापडतात. एकंदर सर्वसाधारण अनुभवापेक्षा अशा विचका झालेल्या संसाराची संख्या अल्प आहे.

याला कारण असावं! आता–'आपण दोघं विरुद्ध सारें जग'—अशा भावनेमुळे कदाचित् त्या संसारांतील एकात्मता अधिक वाढत असेल! किंबहुना, अगदी प्रथम जेव्हा या लग्नाच्या आणाभाका झाल्या, त्यावेळी परस्पर-प्रेमासाठी जगांतील साऱ्या विरोधी शक्तींशी झुंज घेण्याची मनाची जी तयारी तेव्हाच झालेली असते, तिच्या निश्चयानें बळच सुखी संसाराचा पाया घालीत असावं! आणि खरोखर अशा घटनांतूनच मनाची विशुद्धता व सुहृद्भावनेची संपूर्णता फलित होत असते. संकटाला तीच तोंड देते व सहनशक्ति तीमुळेच वाढते.

मी माझ्या स्वतःच्या लग्नाचा विचार करतें, तेव्हा मला वाटतं कीं, हें लग्न म्हणजे कांही मोठी क्रांतिकारक घटना नाही. हिंदुस्थानांत ती नवीन नाही. इतिहासाच्या अगदी सुरवातीपासून जेव्हा परकीयांचें या देशांत आक्रमण झालें, तेव्हा ते नुसतेच या देशांत राज्य करीत राहिले नाहीत. त्यांचेहि या देशांत लग्नादि संबंध झाले व येथील संस्कृतींत ते मिसळून गेले. निर्बंध होते, जातिभेद होते, पण हीं एकात्मत व हें मिसळून जाणें होतच राहिलें. आणि तें अगदी नैसर्गिक होतें. त्या साऱ्याच्या मुळाशी एकच सनातन व चिरंतन भावना होती, "माझं या मुलीवर प्रेम आहे, मी तिच्याशी लग्न करणार, जग काय वाटेल तें करो, माझा निश्चय मी पार पाडणारच! माझी ही श्रद्धा आहे.

आणि, माझा रंगा! तो आपल्या पित्याच्या देशाचा नागरिक म्हणून मोठा होईल! या देशांतच त्याचं घर आहे, त्याचे सारे सवंगडी इथलेच आहेत. त्याच्यावर दोन भाषांचे आणि दोन संस्कृतींचे (कारण पाश्चिमात्य संस्कृतींत जें जें चांगलें आहे, तें तें त्याने आत्मसात् करावे, अशी माझी इच्छा आहे) संस्कार झाले आहेत, आणि दोन देशांत वाढल्याने जो दुहेरी अनुभव मिळतो, तसाच तो मिळून त्याचाहि अनुभव समृद्ध झाला आहे. हिंदुस्थानने त्याला हृदयाशीं धरलं आहे आणि त्यानेंहि—?

• • •

संपादकीय

लेखनाची तारीख १० फेब्रुवारी १९४७

'युगवाणी'चा हा दुसऱ्या वर्षाचा दुसरा अंक. व्यवस्थेंत बदल झाल्याने अद्यापि नवीन घडी नीट बसावयाची आहे. यामुळे अंक ठराविक तारखांना प्रसिद्ध होण्यास अजून थोडा अवकाश आहे. तथापि तो तो अंक त्या त्या महिन्यांत मात्र निश्चित बाहेर पडेल.

'युगवाणी'त सुधारणा करण्यास भरपूर वाव आहे, याची मला व व्यवस्थापकांस जाणीव आहे. पण संकल्पित सर्वच सुधारणा अंमलांत आणण्यास मासिक स्वतःच्या पायावर उभें राहिलें पाहिजे आणि तसें चढून येण्यास पुरेसा कागद मिळाला पाहिजे. पुरेशा कागदाच्या अभावीं मासिकाच्या अवश्य तितक्या प्रति काढतां येत नाहींत, एवढेंच नव्हे, तर पृष्ठसंख्याहि वाढवितां येत नाही. कागद मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे व त्यास यश येतांच मासिकांत अधिक आकर्षकपणा आणतां येईल, एवढेंच तूर्त नमूद करतों.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कंपूशाहीचा वृथा आरोप

वऱ्हाड-मध्यप्रांतांत देशपांडे, आडनांवाचे कांहीं साहित्यिक आहेत व त्यांपैकीं बरेच पुसद येथे उपस्थित होते. यावरून-व इतरहि कांहीं गोष्टींवरून-नागपूरच्या ' इन्किलाब ' पत्रांत देशपांडे मंडळीवर कंपूशाहीचा आरोप करण्यांत आला होता, पण तो सर्वस्वी अवास्तव होता! या प्रांतांत कित्येक देशपांडे साहित्य क्षेत्रांत भलें-बुरें कार्य करतात, हा केवळ योगायोग होय. त्यांत कंपूशाही कसली आली? देशपांडे हें आडनांव यदृच्छेने चिकटल्यामुळे तें धारण करणाऱ्या व्यक्ति ' परस्पर-प्रशंसा-मंडळ ' स्थापन करतात, असें समजणें, म्हणजे या प्रांतांतील देशपांडे नावाचे लेखक अतिशय उथळ व पोरकट आहेत, असेंच गृहीत धरण्यासारखें आहे! देशपांडे नांवाच्या लेखकांनीं आडनांवच बदलून टाकावें, असें एकजण विनोदानें म्हणाला होता!

पुसदच्या अधिवेशनांत कुणास कांहीं गैर आढळलें असल्यास त्यानें कारण स्वतंत्रच मानलें पाहिजे. त्याच्या मुळाशीं कंपूशाहीची वृत्ति असल्याचें गृहीत धरणें हा शुद्ध अन्याय आहे!

पद्मपुरास भवभूतीचें स्मारक उभारा!

विदर्भ-साहित्य-संघाचें पुढील अधिवेशन गोंदिया येथे भरणार आहे. गोंदियापासून जवळच महाकवि भवभूति याचें ' पद्मपुर ' हें जन्मस्थान आहे. या पद्मपुराचा शोध आपल्या प्रांतांतील अग्रगण्य संशोधक प्राचार्य म. म. मिराशी यांनी लावला आहे व तो हळूहळू विद्वन्मान्य होत आहे. पद्मपुर येथे प्राचीन अवशेष विपुल आहेत. अशा या ठिकाणीं भवभूतीचें स्मारक उभारलें जाणें अत्यंत आवश्यक आहे. प्रांताचें कॉंग्रेस-मंत्रिमंडळ व विद्याप्रेमी धनिक यांनीं मनावर घेतल्यास असें स्मारक उभारणें फारसें कठीण नाहीं. गोंदियाच्या अधिवेशनापूर्वी असें स्मारक होऊं शकलें, तर ती एक महनीय घटना होणार आहे, हें उघड आहे.

विदर्भ-साहित्य-संघाच्या परीक्षा

विदर्भ-साहित्य-संघातर्फे चालू वर्षापासून साहित्यविषयक परीक्षा घेण्यांत येणार आहेत. या परीक्षा लोकप्रिय करण्याची जबाबदारी प्रांतांतील शिक्षक-वर्गावर आहे, असें येथे सुचवून ठेवणें अगत्याचें वाटतें. महाविदर्भांतील सर्व जिल्हे व तालुके याठिकाणीं या परीक्षांचीं केंद्रें यंदा उघडलीं जावयास पाहिजेत. तरच ही योजना पूर्णपणें यशस्वी होऊं शकेल.

वि. सा. संघाच्या या परीक्षांना सरकारी मान्यता प्राप्त होणें अत्यवश्य आहे. या दिशेनें संघाचे कार्यकर्ते योग्य ती खटपट करणार आहेतच.

महाराष्ट्र-साहित्य-परीषदेच्या अशा परीक्षा आहेत, हें सर्वश्रुतच आहे. या परीक्षांशी चढा-ओढ करावी, म्हणून वि. सा. संघाने आपल्या निराळ्या परीक्षा काढल्या, असें क्वचित् बोललें जातें खरें! पण हा आक्षेप अगदी फोल आहे. वि. सा. संघ हा म. सा. परिषदेचेंच कार्य करीत आहे, एवढें म्हटलें म्हणजे वि. सा. संघाचे कार्यकर्ते परिषदेकडे कोणत्या भावनेने पाहतात, हे वेगळें सांगण्याचें प्रयोजन उरत नाहीं. अर्थात् संघाने परिषदेशीं स्पर्धा करण्याचा प्रश्नच कुठे येतो?

वि. सा. संघाच्या परीक्षांकडे समंजस लोक तरी कलुषित बुद्धीने पाहणार नाहींत, अशी आशा आहे.

हें पहा मुद्रणस्वातंत्र्य!

मुंबई सरकारने वृत्तपत्रांपासून जबरदस्त जामीन घेण्याचा धडाका चालविला आहे! ' नव-युग, ' ' अग्रणी ' इत्यादि वर्तमानपत्रांपासून तिकडील सरकारने जामीन घेतल्याचें सर्वांस ठाऊक आहे. आतां, ' केसरी-मराठा ' संस्थेवर ती पाळी आली आहे! जातीयतेच्या विषाचा प्रसार होऊं नये, याची खबरदारी कोणत्याहि सरकारने घ्यावयास पाहिजे, याबद्दल मतभेद होण्याचें कारण नाहीं. पण अशी खबरदारी घेण्याचा जामीनकी हाच एकमेव उपाय आहे की काय? त्र्याण्णव कलमी राजवटींत होणारे प्रकार कॉंग्रेस मंत्रिमंडळाच्या राजवटींतहि घडावे, हा दैवदुर्विलास होय!

सरकारला एखाद्या वृत्तपत्रांतील विशिष्ट लिखाण आक्षेपार्ह वाटल्यास त्याने त्या वृत्तपत्रावर सरळ

(पुढील मजकूर मल पृ. २ वर)

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" मराठा मंदिर "

बहुजन समाजाच्या उन्नतीकरतां मुंबअींत "मराठा मंदिर" ही संस्था स्थापन झाली असून अवघ्या पावणेदोन वर्षांत निरनिराळ्या प्रांतांतील सुमारे दोन हजार सभासद संस्थेच्या पटावर आहेत. मंदिराने नुकतीच साडेपांच लाख रुपयास मुंबअींत अिमारती-करितां जागा घेतली आहे. आयुष्यांत फक्त अेकदांच कमीतकमी १० रु. भरून संस्थेचे सभासद होऊन समाजकार्यास समाज बांधवांनी हातभार लावावा.

'मराठा मंदिर क्लब'

बहुजन समाजांतील बांधवांच्या विचारविनिमयाचें महत्त्व जाणून बाहेरगावाहून मुंबअीस येणाऱ्या पाहुण्यांची राहाण्याची व जेवण्याखाण्याची सोय व्हावी आणि आपल्या चळवळीबद्दल त्यांच्याशीं उहापोह करतां यावा म्हणून क्रिकेट क्लब ऑफ अिंडियाच्या धर्तीवर 'मराठा मंदिर क्लब'ची स्थापना करण्यांत आली आहे व त्याचे सभासदत्व मराठा व तत्सम जातीकरितां खुलें आहे.

'मराठाश्रम'

परगांवच्या मध्यम वर्गीय समाजबांधवांची राहाण्याची व जेवण्याची सोय करण्या-करितां माधवाश्रमाचे धर्तीवर 'मराठाश्रमाची' व्यवस्था असून अेकेवेळीं पंचवीस समाज बांधवांस राहतां येअील अशी व्यवस्था स्वतंत्र खोल्या बांधून करण्यांत येणार आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता: **" मराठा मंदिर "**

३२० ठाकुरद्वार, मुंबअी नंबर २

पाडव्याचे सुमुहूर्तावर मराठा मंदिर प्रकाशन अंक नं. २ बाहेर पडेल. सभासद फॉर्म व प्रकाशन अंक अकोला येथे वतनदार प्रेस व नित्यानंद मोहिते महाराज यांचेकडे व खामगांव येथें रा. नानासाहेब बोबडे वकील यांचेकडे मिळतील.

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९,४२५ मुधोळकर पेठ येथे प्रकाशित केलें.

किरकोळ अंकास ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ